मासिक

# शिक्षणयात्री


वर्ष: ८ वे

मे-जून २०२३

अंक: ६ वा

किंमत: ३० रूपये




# एकदाचे पाय फुटले की

एकदाचे पाय फुटले की,
रस्तेही फुटतात

कुठल्या एका रस्त्याने
चालावे हे ठरत नाही
आणि ठरवताही येत नाही
अशी स्थिती आली की वाटते

जिथून पाय फुटले
रस्ते फुटले
तिथेच परतावे
आणि पुन्हा निश्चिंत होऊन जावे

पण हे शक्यच नाही
एकदा का चालता
यायला लागले की

जिथं पावलं थबकतात
खोलवर फसतात
अशांचा आधीच अभ्यास
करुन घेतला तर

सापडतोच आपलाही
जगण्याचा हमरस्ता

अनेक टोलनाके
भेटलेत तरी माघारी फिरु नये
किंवा ते चुकवूही नयेत
जीवघेणे झाले तरी

माघारीचे रस्तेही
फसवे असू शकतात

कुणी अडवणार नाही
तुमचे आकाश भरारीचे रस्ते
एवढीच दक्षता घेणेच
महत्त्वाचे असते

एकदाचे पाय फुटले
आणि रस्तेही फुटले तरी

**शशिकांत हिंगोणेकर** जळगांव
७२१८७९२१८६

# अंतरंग


**शब्दांच्या सोबतीने**

आश्लेषा महाजन /३

**बारावी झाली पुढे काय**

डॉ.विजय पांढरीपांडे /६

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

डॉ.ह.ना.जगताप /८

**लेकरांमुळे जगणं सुगंधीत झालं**

युवराज माने /१०

**शिवरायांचा ३५० वा राज्याभिषेक दिन**

प्रा.प्रशांत शिरूडे /१३

**आनंददायी शिक्षणासाठी**

किरण दशमुखे /१६

**ध्येयाचा ध्यास**

एकनाथ आव्हाड/ १८

**सुसंस्कारित शिक्षण**

चंदना भवर/२१

**प्रचलित शिक्षण पद्धतीत शिक्षकाची भुमिका**

सुरेश उतपूरे /२४

**कांगारू रॅट**

डॉ.नंदा हरम /२६



मार्गदर्शक

मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक

सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक

संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य

विजय गायकवाड

युवराज माने

डॉ.युवराज पवार

अंक जुळणी

प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन

डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ

साभार आंतरजाल

कार्यालय प्रमुख

जगदीश पाटील

**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक

# शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजन हिताय ।।

वर्ष : ७ वे अंक: ६ वा मे–जून २०२३

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

**Online** पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322

IFSC Code : BARB0SHIRPU

वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे

संपर्क पत्ता–

संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायक्षेत्रांतर्गत.

संवाद



सुभाषदादा कुलकर्णी
संपादक

*आज शिक्षण हे चहू बाजूंनी समृद्ध होत आहे. शिक्षणाच्या विविध शाखांतून प्रत्येक विभागाचे सूक्ष्म वर्गीकरण करून त्या-त्या शाखेत विद्यार्थी घडविण्याचे काम वेगाने सुरू आहे. ही जशी जमेची बाजू असली तरी या साऱ्या शिक्षणव्यवस्थेत संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यात ही शिक्षणव्यवस्था कमी पडली आहे असे चित्र आज तरी दिसते आहे.*

*गुर्रु ब्रह्मा गुर्रु विष्णू गुर्रू देवो महेश्वरा...! या सोबत मातृदेवो भव: पितृदेवो भव: हे सर्व मंत्रबद्ध आहेत. हे संस्कार आणि त्याबर असलेले आचरण हे भूतकाळात जमा झालेले आहे. सर्वात सुशिक्षित कोण जो आईला मॉम, वडिलांना डॅड, भावाला ब्रो म्हणण्यात आजची पिढी स्वत:ला पुढारलेली समजत आहे. याच शिक्षण पद्धतीत आई वडिलांना नमस्कार करणे, मोठ्यांचा मान ठेवणे या गोष्टी कुठेच दिसत नाहीत. एस.टी.तून प्रवास करतांना तरणी ताठी मुल सीटवर बसलेली असतात तर वयस्क माणसे काठीचा आधार घेवून उभी राहिलेली असतात आणि ही सारी मुल आपआपल्या मोबाईलमध्ये गुंग होवून बसलेली दिसून येतात. शेजारी वयस्क माणसे उभे आहेत याचे भान त्यांना नसते आणि भान आले तरी ते जाण ठेवत नाही.*

*बदलत्या काळानुरूप पिढी बदलत असते हे जरी खरे असले तरी बदलणे इथपावेतो ठिक आहे. पण ती पिढी बदलण्या ऐवजी बिघडलेली पहायला मिळणे म्हणजे कुठेतरी शिक्षणातून पुस्तकी ज्ञान ज्याला तुम्ही नॉलेज म्हणतात तेवढेच फक्त दिले जात आहे. असे म्हणावे लागेल.*

*आजच्या काळात वेगवेगळ्या क्लासेस सोबत असे संस्कार वर्ग उघडण्याची आवश्यकता निर्माण होणे यातच आपल्या शिक्षण व्यवस्थेतील संस्कारांची उणीव जाणवते. याची वेळीच पालकांनी शिक्षण तज्ञांनी शासनाने दखल घेणे गरजेचे आहे. शिक्षणासोबत संस्कारांचे संस्कार त्यावर झालेच पाहिजे तरच शिक्षणव्यवस्था निकोप राहिल आणि उद्याचा विद्यार्थी संस्कारक्षम नागरीक घडेल.*

लेखन प्रवास

# शब्दांच्या सोबतीने...



आश्लेषा महाजन
पूणे

एका खेडेगावामध्ये माझा जन्म आणि शिक्षण झालेले आहे. त्या गावाचं नाव नारायणगाव. तालुका जुन्नर जिल्हा पुणे. नारायणगाव जवळच शिवनेरी महाराजांची जन्मभूमी आहे, ओझर आहे. तेथे माझे आई वडील शाळेमध्ये शिक्षक होते आणि कवितेच्या तासाला शाळेमध्ये असताना विशेषतः कविता शिकवत असताना कधीतरी एकदा दोनदा असं झालं की डोळे पाणावले, काहीतरी, त्यातला एखादा शब्द झंकारून गेला. एखादी ओळ अशी मनामध्ये दाटून बसली आणि अक्षरशः हुंदका फुटला.ती दुःखी कविता होती असं काही नाही. कविता होती.हुंदका फुटण्यासारखे यात काय अस मला वाटलं. मला कविता वाचताना काहीतरी होतं आतून असं आईला विचारलं. आई म्हणाली तुझे शब्दांशी नातं आहे.तू शब्दामध्ये गुंतत आहे.आणि तुला आवडतं हे सगळं! आणि आई पण माझी लिहायची. शिक्षिका असल्यामुळे वाचायची. वाचन भरपूर होतं तिचं. घरामध्ये पुस्तक,मासिक आणि शब्दकोश भरपूर असायचे.सगळे वृत्तपत्र शाळेमध्ये यायची.त्यामुळे वाचली जायची. अशा प्रकारे शब्दांची नातं असतं ही गोष्ट मला शाळेमध्ये लक्षात आली आणि मग मी शब्दांवर जास्त विचार करायला लागले. सुरुवात केली नावापासून! वडिलांना विचारलं हे कुठलं नाव माझं, आश्लेषा? किती अवघड आहे? लोकांना काय काय लिहिताना अडचणी वगैरे वगैरे ? माझे वडील संस्कृत शिकवायचे .वडिलांनी त्याचा अर्थ सांगितला. तुम्हाला सांगायला आवडेल मला की आपण विश्लेषण हा शब्द नेहमी वापरतो. विश्लेषण म्हणजे विघटन करणं, एखाद्या गोष्टीची फोड करणे तर आश्लेष म्हणजे एकत्र करणे ! कवेत घेणं,आलिंगन देणं ! हा शब्द मला इतक्या बालपणी समजला आणि मग शब्दांच्या बद्दल सखोल जायचं ठरवलं. प्रत्येक शब्द कुणाचं नाव असेल तर त्याला नावाचा अर्थ विचारायचा, कुठला गाव असेल तर त्या गावच्या शब्दांपासून अशी ती छोटी छोटी सुरुवात झाली आणि मग निबंध लिहिताना आपण अगदी व्यवस्थित लिहिला पाहिजे अक्षर उत्तम असलं पाहिजे हे सगळे शब्दांशी नातं असण्याचे प्रकार आहेत ते अक्षरही चांगलं पाहिजे असं ते वाटत राहणं आणि अचूक शब्द आपण निवडला पाहिजे असं वाटत राहण. यासाठी वाचलं पाहिजे.चिंतन केलं पाहिजे.वाचलेलं सांगितलं पाहिजे.या पुस्तकात काय हे सांगितलं पाहिजे. म्हणजे त्या पुस्तकाची गोष्ट सांगितली पाहिजे. असं एकात एक वाढत गेलं. साहित्यिका होण्या आधीचा हा प्रवास आहे. एक घटना छान घडली माझ्या आयुष्यात. ती म्हणजे सातवीत वगैरे होते मी. सातवीचे शेवटचे महिने होते. शेवटच्या महिन्यात माझी आई लेखिका म्हणजे लिहायची. तिचं पहिलं पुस्तक त्या काळामध्ये आलं आणि पुस्तक येणं काय असतं, पुस्तकाचं आगमन काय असतं ते मी या शालेय वयामध्ये अनुभवलं आणि मग ते प्रुफ रीडिंग काय आसतं, अर्पण पत्रिका म्हणजे, मुखपृष्ठ म्हणजे काय हे शब्द मला ज्या वयात मुलं पुस्तक हातात पण घेत नाही त्या वयात मला कळले. अर्पण पत्रिका म्हणजे पुस्तक कुणाला तरी अर्पण करतात .त्याचा चित्रकार असतो. चित्रकाराच्या नाव पानाला असतं. त्या पणाला क्रेडीट लाईन म्हणतात.खाली मूल्य असतं. मागचं पान मलपृष्ठ असतं.

आईचं पुस्तकात कवितांचा क्रम ठरवताना चिंतन असयाच. पहिली ही ,दुसरी ही एडिट हा शब्द समजला. हळूहळू मग पुढे या क्षेत्रात आपलं काहीतरी आपण केलं पाहिजे असं वाटायला लागलं. शाळेच एक नियतकालिक एकलव्य नावाचं निघायचं आणि माझे निबंध वर्गामध्ये वाचून दाखवले जायचे. बघा काय छान निबंध लिहिले असं म्हणायचे. आणि माझे निबंध वर्गामध्ये वाचून दाखवले जायचे. तर तो निबंध हे सुद्धा मला वाटतं त्या काळातले लेखनच होतं. पण कळत नव्हतं की आपण काहीतरी लेखक या नात्यानं लिहितोय याची काहीतरी जाणीव नव्हती पण तो म्हणजे तोच पहिला धडा असावा आणि कवितेचे म्हणाल तर खेडेगावात राहिल्यामुळे आणि तो काळ टीव्ही नसण्याचा म्हणजे टीव्ही आलेला होता पण आमच्या घरात नव्हता. आमच्या घरात टीव्हीला स्थान नव्हतं. वडिलांच्या दृष्टीने पुस्तक वाचा, निसर्गात फिरा आणि माणसं वाचा. टीव्ही वगैरे काही नाही तो जो काळ आहे टीव्ही नसण्याचा आमच्या घरातला तो काळ मला वाटतं महत्त्वाचा माझ्यासाठी ठरला. टीव्ही पाहिली असती तर काहीतरी वेगळं झालं असतं.आता बघते टीव्ही अधूनमधून. पण घडण्याच्या काळामध्ये टीव्ही नसण्याचा हा एक फायदा झाला मला असं वाटतं. नंतरच्या काळामध्ये मी पुण्यात आल्यानंतर एस पी कॉलेज मध्ये थोड लेखन केलं.अशी जाणीव नव्हती कि आपण काहीतरी वेगळं लिहितोय.पण जाणीवपूर्वक लिहिलं पाहिजे असं वाटायला लागलं तेव्हा दैनिक केसरीत पुस्तक परीक्षण पाठवली. माझे जर्नालीझम झालं होतं.सुरुवात केसरीपासून झाली,नंतर सकाळ,लोकसत्ता ,बालकुमार यातही लिहिलं. एकाच प्रकारच नाही तर संकीर्ण स्वरुपात लिहायचे.कविता माझ्या मनात होती.काहीजण असे म्हणतात कि तू शिंकली तरी ती कविता होईल. सुरवातीला कवितेत सुचतं, पण सुचलेलं कवितेत मावत नाही .याचा लेख केला पाहिजे.प्रयत्नपूर्वक म्हणजे काही गोष्टी केल्या मग त्याच्यासाठी समीक्षेची पुस्तक असतात .कविता म्हणजे काय,ललित म्हणजे काय,कथा कशी मांडायची अर्थात अस वाचून कोणी लेखक होत नसतो,कवी होत नसतो. पण मार्गदर्शन मिळत त्यातून.ललित लेख म्हणजे काय आणि वैचारिक लेख म्हणजे काय वाचून आपल्या लक्षात येतात. त्या दृष्टीने आपण चौकटी आखून घेतो. एखाद्या संपादकांनी सांगितले की तुमचं एक ललित पाठवां तेव्हा आठवून आपण प्रयत्नशील राहतो.

लेखनाचा आवडता विषय म्हणाल तर कवितेवर पहिले प्रेम आहे. जगाच्या पाठीवर जे विषय आहेत त्या कुठल्याही विषयावरती कविता होऊ शकते पण तुम्ही म्हणता ते तुमचं प्रश्न थोडा बदलून मी असं म्हणेन की भावकविता मला आवडतात लिहायला किंवा माझ्या हातून लिहिल्या जातात किंवा माझा तो पिंड आहे .

लेखनासंबंधी काही युक्त्या आपण राबवू शकतो. मुला मुलीना त्याच्या नावापासून सुरुवात करायला सांगा तुझ नाव काय? तर मेघना किवा सरिता. त्या शब्दाचे अर्थ शोधायला सांगा.काहींना आपल्या नावाचा अर्थ माहीतच नसतो.चुकीचा अर्थ माहित असतो. तो दुरुस्त करायचा. काही मुलीना रंगाचे आकर्षण असते. त्या दृष्टीने त्या रंगाशी संबंधित काहीतरी किंवा त्या जवळपास असं काहीतरी वाचायला सांगणं असं एक म्हणजे अशी एक युक्ती आपल्याला करता येऊ शकते आणि म्हणजे तुम्हाला वेळ असेल शाळेमध्ये, तुम्हाला खूप काम असतात मला कल्पना आहे पण असा ट्रेजर टाईप असं पण काहीतरी करता येऊ शकते. की एक दहा चिठ्या तयार करायच्या आणि एकातून एक एकातून एक की आता तू म्हणजे आता समजा तुमची शाळा आहे अशी एक हॉल आहे एक पुस्तक ठेवले आणि ते तू वाच आणि त्याच्याबद्दल उद्या मला चार दिवसांनी त्याच्याबद्दल तू सांग मला. असं काहीतरी करू शकतो आपण. नंतर आपल्या गावाबद्दल आपल्याला आकर्षण असतं किंवा मूळ गाव आपल्या गावाबद्दल, नदीबद्दल, देशाबद्दल म्हणजे ट्रिगर शब्द वापरून वाचनाची आवड वाढवू शकतो. पुस्तकातील धड्याच्या अनुषंगाने किंवा सहल चित्रपट प्रवास हे अनुभव, चित्रपट पाहिला, सहल झाली हे झाले तर चित्रपट पाहिल्यानंतर त्या चित्रपटाच्या अगदी विपरीत सुद्धा एखादं पुस्तक असू शकते जे एखादा चित्रपटाची माय लेकीच्या नात्याबद्दल पण मायलेकीच्या वेगळ्या नात्याबद्दलचा की, म्हणजे आई मुलीला त्रास देते असं पण एखादी आई असू शकते असं पुस्तक वाचायला देण, एकदम विपरीत असं पण करू शकतो किंवा त्याच आशयाच पण देता येईल असं पण करू शकतो. महेंद्र सरांशी बोलणं चाललं होतं तेव्हा ते म्हणाले की, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मुलांना मुलांनी शिकत

राहणं हे खूप महत्त्वाचं आहे. त्यांना प्रश्न पडले पाहिजे त्यांचे प्रश्न आपण दाबून टाकता कामा नये त्या दृष्टीने त्याना प्रश्न विचारण्यासाठी पण कधीकधी मोकळीक द्यायला पाहिजे. काहींना असं वाटतं हे कसे विचारू शकता ? तर तो मोकळेपणा दिला की, ते प्रश्न विचारतील आणि मग उत्तर तुम्हाला या पुस्तकातून मिळतील त्यासाठी वाचन कट्टा किंवा असं काही करता येऊ शकतं. नंतर वाचलेल्या पुस्तकाचा पुस्तकासह तुम्ही फोटो पाठवा की, हे पुस्तक मी वाचलं आणि हा माझा फोटो! आता मोबाईल मुळे ते शक्य आहे. त्यामुळे तो एक प्रकार आहे आणि तो तुमचा एखादा समूह असेल तर ते त्या समूह की अरे ह्या मुलींनी हे पुस्तक वाचलं तर मुलांना पेन्सिल घेऊन बसा माझी पद्धत ही की बारीक बारीक कुठेतरी खुणा करा. मग त्या खुणांच्या अनुषंगाने तुम्ही जर १०० पानांच पुस्तक वाचलं तर त्या पुस्तकाविषयी २० ओळीत लिहा त्या मुद्यांच्या अनुषंगाने पुस्तक वाचतात. पुस्तकाची पुनर्निमिती व्हायला पाहिजे, की अरे मी हे पुस्तक वाचलं, या पुस्तकात हे हे आहे. ही वाचन संस्कृती पुढे पुढे जाण्यासाठी त्याच्या नोंदी होणं फार महत्त्वाचे पुस्तक त्यासाठी पुस्तक अनुभवनं, म्हणून मुलांना सांगा हे मुख्यपृष्ठभाग आहे, बघा नावाच्या शीर्षका प्रमाणे त्यांनी कसं चित्र काढले पासून सुरुवात करून पुस्तक अनुभवायला सांगा.पुस्तकाची खिडकी कशी उघडायची आणि आत कसे जायचे हे सांगा. मुलांना वाचन ,अभिवाचन, क्रमशः वाचन आणि रेडिओ किंवा मुलांनी स्वतःच आता मोबाईल आहे मुलांनी एक पुस्तक घेऊन दहा मुलं ठरवायची आणि पहिली दहा पाने ह्यांनी वाचायची पुढची दहा पानं दुसऱ्यान वाचायची. असं वाचून रेकॉर्ड करायची.मु प्रलोभन असेल.मग ते वाचनाला लागतील.

मुलासाठी पुस्तक निवडताना जड पुस्तक निवडू नका. स्वतःचा भावविश्वातील निवडा.मुलांना काय आवडत तेपहा. धाडस,साहस अद्भुत पुस्तक द्या.अद्भुत रस तर नाहीसा व्हायला लागलाय.वैचारिक,हे असे करावे,यशाची गुरुकिल्ली, वगैरे .अरे यश बिश काही नको,मिळायचे ते मिळेल ! त्यापेक्षा शौर्य धाडस फजिती पण चालेल ! अशी पुस्तक द्या.मुलांना मूल्य शिकवायची म्हणून त्यांना रुक्ष न करता कथेच्या माध्यमातून रंजक अनुभव द्या.शब्दकोश आपण कधी मुलांच्या समोर असे सहज दिले असं होत नाही पण काही मुलांना कथा कादंबरी नाही आवडत. त्यांना कोश आवडतात. हा पक्षी, याचा हे वर्णन हे, हा या भागात सापडतो, ह्याचा वेणीचा हंगाम हा आहे, इतरही कोश असतात. इतर भागातल्या डोंगरांबद्दलची माहिती सांगणारे हे पण त्यांना द्यायला पाहिजे. सगळ्यांना ललित वगैरे नाही आवडत, कविता खूप जणांना वरून जाते. ठीक आहे मग त्यांना तुम्ही लागू नका की तुम्ही मागे कविता वाचलीच पाहिजे. त्यांना हे बाकीचं माहितीपूर्ण आणि कोश असे हे तीन आपण जर वाचनाचे प्रकार बघितले तर पहिला प्रकार म्हणजे वर्तमानपत्र. वर्तमानपत्रांमध्ये शाळेमध्ये तुमचं काहीतरी अर्धा तास असेल वर्तमानपत्र वाचण्याचा तर तुम्ही असं करू शकता की या चारच पान घ्यायची कारण खूप मोठा केला की पान विखुरतात. चारच पान घेतली आणि यातली तुम्हाला कुठली बातमी स्पर्शून गेली हे विचारा. आजच्या वर्तमान पेपरात दुखद बातमी आहे. एका लग्नामध्ये खूप जोरजोरात बँड आणि काय काय वाजत होतं ते शेजारच्या आजोबांना त्रास होत होता त्यांनी त्यांना जाऊन सांगितलं की मी पेशंट आहे मला त्रास होतोय तर आवाज कमी करा तर त्या लग्नाच्या नवरदेवांनी त्या आजोबांना मारहाण केली. घरच्यांनाही मारहाण केली. आजोबांनी दुसऱ्या दिवशी आत्महत्या केली. मुलीकडच्यांनी त्यांच्या लक्षात आलं की हे प्रकरण आता खूप तापणार आहे. मुलीकडच्यांनी काय केलं, त्यांनी पोलिसांना जाऊन सांगितलं की तुम्ही हे प्रकरण लग्न होईपर्यंत दोन दिवस ठेऊ नका. लग्न झाल्यावर आपण बघू. आम्ही एवढा खर्च केलेला लग्नाला, एवढं सगळं हे केलं म्हणून लग्न होऊन जाऊ द्या. मला असं वाटलं की ती मुलगी ह्याच्याशी लग्न करणार नाही असं म्हणेल. पण ती दबावात असेल कदाचित. ती नाही म्हटलं नाही. अक्षदा पडली डोक्यावरती आणि त्याची मिरवणूक काय ते वरात निघायच्या ऐवजी त्याला पोलिसांनी पकडलं या विषयावर मुलांना काय वाटत हे विचारा. तर प्रत्येक मुलाचं काहीतरी वेगळ मत असेल. प्रत्येक मुलाच्या मनामध्ये काहीतरी वेगळं वेगळी कथा निर्माण होईल .कुणाला कथा तर कुणाला कविता लिहावी वाटेल. त्यांचे मत जाणून त्यांना पुस्तक वाचायला द्या.

(ज्ञानप्रबोधिनी पूणे येथील प्रबोधन दूताच्या कार्यशाळेतील मा.आश्लेषा महाजन यांचा शब्दांचा सोबतीचा प्रवास त्यांच्याच शब्दात.)

आज काल

# बारावी झाली,पुढे काय?



डॉ.विजय पांढरीपांडे
हैद्राबाद

बारावीचे निकाल लागले.आजकाल अनेकांना ९० टक्के मिळतात. त्यांचे फोटो सत्कार ,मुलाखती असे सारे सुरू असते.या जाहिरात बाजीला नको तितके महत्व आले आहे.याचा परिणाम कमी टक्के मिळालेल्या मुलांवर होतो. त्यांच्यात न्यून गंड निर्माण होतो.वास्तविक ही गुणाची टक्के वारी मुला मुलींच्या हुषारीची, बुध्दीमत्ते ची खरी ओळख नसतेच.आजच्या बोर्डाच्या परीक्षेचे स्वरूप,प्रारूप बघता परसेंटेज अन् इंटेलिजन्स याचा अर्था अर्थी फारसा संबंध नसतो.त्यामुळे कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश होण्याचे कारण नाही.आपले काय होईल या विचाराने खचून जायचे मुळीच कारण नाही. या बोर्डाच्या निकाला बरोबरच इंजिनियरिंग,मेडिकल याच्या राष्ट्रीय, राज्य स्तरावरील परीक्षांचे देखील महत्व वाढले आहे. या परीक्षा क्रॅक करणे( ही आजची भाषा!) म्हणजे स्वर्ग गाठणे अशीही समजूत झाली आहे.या परीक्षा घेणारे मंडळ, प्राधिकरण बोर्डाच्या निकालावर अवलंबून राहत नाही यातच सारे काही आले!या परीक्षा साठी मुलांपेक्षा त्यांचे पालक जास्त धास्तावले असतात.ते मुलावर नको तितके दडपण देतात.या तणावामुळे मुलांचे नको तितके खच्चीकरण होते.मना सारखे यश मिळाले नाही तर त्यातून बाहेर येणे अनेक मुलांना जड जाते.अनेक पालक याचा विचार न करता मुलावर ओरडतात.अनेकांना इंजिनियरिंग,टेक्नॉलॉजी म्हणजे काय,त्यात विविध कोर्सेस मध्ये नेमके काय शिकवले जाते, त्याचा पुढील वाटचालीत करीयर साठी उपयोग काय हेही माहिती नसते!अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे असा हा एकूण प्रकार असतो. आजकाल तर पूर्वीच्या तुलनेत अनेक नवे विषय,कोर्सेस पुढे आले आहेत.सर्वच क्षेत्रात स्कोप आहे. संधी आहे,जर तुम्ही त्यात जीव ओतून मेहनत घेतली तर!एक क्षेत्र श्रेष्ठ,बाकी कमी प्रतीचे असे काही नसते.प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी आपण शाळा कॉलेजात जे शिकतो त्यापैकी फार कमी उपयोगाचे असते,वापरले जाते.आपल्याला सतत नवनवे शिकावे लागते.तरच आपला निभाव लागणार.मला हे येत नाही,मी हे शिकलो नाही अशी भाषा आता कुणीच ऐकून घेणार नाही. येत नाही तर शिकण्याची तयारी हवी. इंजिनियरिंग, मेडिकल, या बरोबरच, मूळ विज्ञानाच्या सर्व शाखा, अर्थ शास्त्र,मॅनेजमेंट,हॉटेल,फॅशन इंडस्ट्री,सेवा क्षेत्र, संगीत, नृत्य,नाट्य, साहित्य,समाज शास्त्र, पर्यावरण, मानसशास्त्र, स्पोर्टस अशी किती तरी दालने नव्या पिढीला उपलब्ध आहेत.या सर्व क्षेत्रात आव्हान आहे,संधी आहे, उज्वल भविष्य आहे.प्रसिध्दी,अन् पैसा देखील आहे. त्यामुळे मुलांनी पुढील शैक्षणिक करीयरच्या बाबतीत एकांगी विचार न करता,आपले स्नेही काय करतात,पालक काय जोर जबरदस्ती करतात याच्या नादी न लागता,आपल्याला काय आवडते, काय झेपेल, काय शक्य आहे,आपली एकूण परिस्थीती काय आहे,याचाच विचार करावा,अन् त्यानुसार निर्णय घ्यावा.एरवी इतरांच्या नादी लागून चुकीचा निर्णय घेतला तर पुढे पश्चाताप करावा लागेल.मग घड्याळाचे काटे उलटे फिरवता येणार नाहीत. बारावी पर्यंत, आपली क्षमता, आपली

मर्यादा, आपली आवड आपल्याला समजली असते.तेव्हढे ज्ञान शालेय शिक्षणातून मिळाले असते.आपले निर्णय चुकले ट्री हरकत नाही.चुका करतच माणूस पुढे जातो,शिकतो.पावला पावलावर रिस्क असते.अडचणी येतात.त्यातूनच मार्ग काढीत पुढे जायचे असते. बारावी नंतरचा प्रवेश हा तुमच्या पर्सेंतेज वर अन् असलीच तर प्रवेश परीक्षेच्या रँक वर अवलंबून असतो.म्हणजे ही प्रक्रिया तुमची,आवड,तुमचे कौशल्य,तुमचे व्यक्तिमत्व याचा विचार करीत नाही.हा विचार तुमचा तुम्हालाच करावा लागतो.म्हणजे चांगले गुण असुनही तुम्ही वेगळा,इतरांना कमी प्रतीचा वाटणारा कोर्स निवडला तर इतर लोक काय म्हणतील याचा विचार गौण ठरतो. शेवटी आपले भविष्य आपल्या हातात असते.ते इतर कुणी ठरवायचे नसते. पैसा,प्रतिष्ठा याला फारसे महत्व नसते. अगदी कमी शिकलेल्या व्यक्ती देखील लाखो करोडो कमावताना आपण बघतो.पण ती मंडळी आनंदी,समाधानी असतात का हे महत्वाचे.खूप पैसा जवळ असूनही शेवटी तो उपयोगाचा नसतो हे करोना काळात आपण शिकलोच.ज्या कोर्स ने,शिक्षणाने आपल्याला आनंद लाभेल,शिकताना मजा येईल तो कोर्स निवडावा. ही निवड तशीही अंधरातली उडी(रिस्क) असते.आहे अनेक निर्णय यापुढे धाडसाने घ्यावे लागतात.निभावून घ्यावे लागतात.मग यशापयश जे काही पदरी पडेल ते आहे तसे स्वीकारण्याचे सामर्थ्य आपोआप लाभते. लहान पणी शाळेत शिकलेली एक कविता आठवते: हे घेऊ का ते घेऊ दुकान उचलून का नेऊ? अशीच संभ्रमावस्था बारावी नंतर कोर्स ची निवड करतानाही होते. न आवडलेले खेळणे आपण टाकून देतो. पण अशी धरसोड वृत्ती शिक्षण, करीयर ची निवड करतांना कामाची नसते.हा निर्णय पुढचा मागचा सारासार विचार करून घ्यायचा असतो.जबाबदारीने घ्यायचा असतो.आहे वेळी मोठ्याचा, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निर्णय घ्यायला काही हरकत नाही.ऐकावे जनाचे पण शेवटी करावे मात्र मनाचेच! या लेखाचा उद्देश नेमका सल्ला देणे हा नव्हताच,नाही..तर योग्य निर्णय घेण्यासाठी बारावी नंतरच्या उंबरठ्यावर उभ्या मुलांना आपला मार्ग आपणच ठरविण्यासाठी प्रवृत्त करणे हा होता.हे समजले की सारे समजले असे म्हणायला हरकत नाही.शुभास्ते पंथाना संतु!

-७६५९०८४५५५


# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका
शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**With pay any app**

चिंतन

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
# पूर्वतयारी स्तर



डॉ.ह.ना.जगताप
सोलापूर

पायाभूत स्तरातून पूर्वतयारी स्तरात येताना विद्यार्थ्यांचे वय ९ वर्ष इतके असेल व तो ११व्या वर्षापर्यंत या स्तरात शिक्षण घेईल. म्हणजेच इयत्ता तिसरी , चौथी व पाचवी चा समावेश या स्तरात होतो. पायाभूत स्तरांमध्ये विद्यार्थ्यांची अक्षर ओळख चांगली झाली असेल तसेच त्याला बऱ्यापैकी वाचता येत असेल व गणितातील साध्या मूलभूत क्रिया करता येत असतील असे गृहीत धरलेले आहे . या स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मूलभूत वाचन लेखन व गणित विषय क्षमतांकडे सध्या खूप हेळसांड होत आहे व तिकडे आता खूप गांभीर्याने पाहिले पाहिजे. असे निरीक्षण आयोगाने नोंदविले आहे. आतापर्यंत आपण पायाभूत स्तरापर्यंत परीक्षा हा प्रकार ठेवलेला नव्हता . आता मात्र या स्तरात परीक्षा सुरू केल्या जातील. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना ते प्रामुख्याने कृतीयुक्त व आंतरक्रियात्मक असेल.

विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची किंवा शिक्षकांच्या अध्यापनाची भाषा मातृभाषा किंवा स्थानिक भाषा किंवा राष्ट्रीय भाषा असेल. मात्र या स्तरावर इंग्रजीतून अध्ययन अध्यापन केले तरी चालेल . इतकेच नव्हे तर अगदी आठवीपर्यंत मातृभाषा किंवा स्थानिक भाषेचा वापर केला जावा अशी अपेक्षा या धोरणात केलेली आहे . या विविध पर्यायामुळे आपण कितीही म्हटले तरी सर्वसामान्य जनतेचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे राहिल असे वाटते .

या स्तरावर वाचन, लेखन, बोलणे, शारीरिक शिक्षण, विज्ञान, गणित तसेच कला व भाषा या विषयातील सक्षमता विकसित करणे अपेक्षित आहे . या स्तरावर विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाची ओळख करून दिली जाणार आहे.क्रीडा आधारित अध्यापनाकडून औपचारिक अध्यापनाकडे असा प्रवास असणार आहे . केवळ या स्तरावरच नव्हे तर अगदी माध्यमिक स्तरापर्यंत अभ्यासक्रमातील माहितीचा भाग



कमी केला जावा व त्या ऐवजी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी व सर्जनशीलता तसेच समस्या निराकरण क्षमता यांच्या विकसनावर भर दिला जावा . यासाठी शिक्षकांनी वर्गात अध्यापन करताना शोधात्मक अध्ययन

अध्यापनावर भर द्यावा . आणि म्हणूनच यासाठी वर्गात शिक्षकांनी कथना ऐवजी चर्चा तसेच विश्लेषणात्मक अध्यापनावर भर द्यावा अशी अपेक्षा आहे .

राज्य शासनाने एनसीईआरटीने तयार केलेल्या पुस्तकावर आधारित आपापली पुस्तके तयार करावीत तसेच ही पुस्तके ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध व्हावीत व ती कुणालाही डाऊनलोड करून घेता यावीत . शालेय पाठ्य पुस्तकांचे ओझे कमी केले जावे . पाठ्य पुस्तकांशिवाय अवांतर वाचनासाठीची पुस्तके ही पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (Public Private Partnership) मधून विकसित करावीत .या प्रादेशिक पुस्तकातून स्थानिक संदर्भांचा समावेश असावा आणि या पुस्तकातील आशयामध्ये देखील चर्चा , विश्लेषण व उपयोजन यावर भर असावा . एनसीईआरटी (NCERT ) व एस सी आर टी (SCERT ) यांनी उच्च दर्जाची पाठ्यपुस्तक निर्मिती करावी .

मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांच्या केवळ आशयाच्या स्मरणावर आधारित परीक्षा न घेता सक्षमता विकासाच्या अनुषंगाने मूल्यमापन करावे .विद्यार्थ्यांमध्ये सक्षमता विकसन कितपत झाले आहे , संकल्पना कितपत स्पष्ट झाल्या आहेत , चिकित्सक विचारसरणी कितपत विकसित झाली आहे , हे पाहण्याच्या दृष्टीने मूल्यमापन केले जावे . तसेच आता केवळ बोधात्मक क्षेत्राचे मूल्यमापन न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे मूल्यमापन केले जावे . ( ३६० डीग्री ) यासाठी मूल्यमापनाच्या संख्यात्मक व गुणात्मक साधनांचा वापर केला जावा तसेच मूल्यमापन हे केवळ अंतिम परीक्षेवर अवलंबून न ठेवता ते ऱ्रीरींळींश स्वरूपाचे म्हणजेच विकासात्मक मूल्यमापन असावे .याचा अर्थ अंतिम परीक्षा नाहीत असा होणार नाही . तर सातत्यपूर्ण निरीक्षणातून व अंतिम परीक्षेतून येणाऱ्या फलनिष्पत्तीच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाईल.

आपण आतापर्यंत उद्दिष्टांच्या आधारे अध्यापन करीत होतो या ऐवजी आता अध्ययन निष्पत्तीच्या आधारानेच शिक्षकांचे अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन असणार आहे . मूल्यमापनाचा हेतू देखील विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये व शिक्षकांच्या अध्यापनामध्ये सुधारणा करणे हा असणार आहे .

या स्तरावर आणखी एक मोठा बदल सुचवलेला आहे तो म्हणजे लहान लहान शाळांची शाळासमूह योजना ( school cluster )एखाद्या मोठ्या शाळेला छोट्या छोट्या शाळांना जोडून मोठ्या शाळेमधील असणाऱ्या विविध सोयी सुविधांचा उपयोग व तेथील शिक्षकांच्या तज्ञतेचा उपयोग लहान शाळातील विद्यार्थ्यांना व्हावा अशी अपेक्षा आहे . आपण सर्व शिक्षा अभियान राबविताना वस्ती शाळा सुरू केल्या त्यांची अवस्था सध्या खूपच दयनीय आहे .अशा शाळांना या योजनांचा निश्चित फायदा होईल . अशीच शिफारस कोठारी आयोगाने देखील केली होती . परंतु प्रत्यक्षात ही योजना फलद्रुप झाली नव्हती .

इयत्ता तिसरी, पाचवी, आठवी, दहावी यांच्यासाठी National achievement survey साठीच्या ( N-S ) परीक्षा पुढे चालू राहतील.

-९८२२६१५४६४

मराठी मासिक
शिक्षणयात्री
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक लक्ष्मण गोरख बडगुजर यांच्या मालकीच्या प्रगती आर्टस्,पोलिस स्टेशन जवळ,जनता नगर शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे छापून ,प्लॉट नं. ५२ शिवपार्वती कॉलनी,करवंद नाका,शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक - शैला नंदकिशोर हजारे Reg No.MAHMAR2015/67226

आनंदाचं झाड

# लेकरांमुळे जगणं सुगंधित झालं...




युवराज माने

सेलू-परभणी


प्रचंड व्यासंग हवं असणारं क्षेत्र म्हणजे ' शिक्षण '. खरं तर अफाट व्यासंगाच जे क्षेत्र – ते कुठल्याही इतर स्वस्त धंद्यावल्याना जवळचं वाटू लागलं अन् नको ते होऊ लागलं..'काही होता नाही आले तर मास्तर तरी हो' म्हणणाऱ्यांना सांगावं वाटतं, ' शिक्षक होणं आणि कायम नव्याचा ध्यास घेणं ही साधी बाब नाही. शिक्षक होऊन प्रचंड व्यासंगी होणं म्हणजे लेकरांसाठी 'आनंदाची डहाळी' होणं.ज्या डहाळीवर बसून लेकरं तुमच्या व्यासंगाचा मनसोक्त आनंद लुटतील...तुमच्या ज्ञानाच्या ,उपक्रमाच्या व्यासंगाच्या माध्यमातून जगाच्या सफरी करतील.शिक्षकांचं जगणं म्हणजे नवे संदर्भ ग्रंथ तयार होणं होय.व्यासंगी शिक्षक म्हणजे चालतं बोलतं विद्यापीठच असतात.

सतरा वर्षापूर्वी लेकरांच्या सुगंधित मळ्यात प्रवेश केला अन् जगणं सुगंधित होऊ लागलं.मला बालपणापासूनच आपल्या गुरूजीचं आकर्षण होतं.मला माझ्या गुरुजींनी जवळ घ्यावं,पाठीवरून हात फिरवून शाबासकी द्यावी,चुकलंच एखादं गणित तर समजून सांगावं..... असं बरंच काही वाटायचं पण असं कधीच झालं नाही. मग पुढे मीच गुरुजी म्हणून लेकरांच्या समोर आलो.गोंदिया जिल्ह्यात सेवेला सुरुवात झाली.आदिवासी नक्षलग्रस्त भागात काम करताना तेथील लेकरांनी आणि पालकांनी भरपूर प्रेम दिलं.निसर्गावर प्रेम करणाऱ्या,निसर्गाच्या नियमांचा आदर करणाऱ्या या लेकरांमध्ये आणि तेथील माणसांमध्ये राहून माझ्याही आयुष्याला एक नवी दिशा मिळाली.आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून आनंदी कसं जगावं हे मी तेथील माणसांकडून शिकलो.नशिबात फाटकं आलं तर त्याला नेटकं करून सुंदर जगता येतं हे मला चांगलंच कळालं. निसर्गावर प्रेम करणारी ही माणसं उत्सवप्रेमीही होती. वर्षभरातील सर्व सण उत्सव अगदी उत्साहाने साजरा करणारी ही माणसं.त्या कुटुंबातून येणारी लेकरंही तेवढीच उत्साही असायची.गायीच्या कासंला ढुश्या मारून दूध पिणाऱ्या वासराप्रमाने लेकरं मला रोज नव्या उपक्रमासाठी हट्ट करायची त्यांनी मला कधीच स्वस्थ बसू दिले नाही की, रात्री झोपू दिलं नाही.रात्रीही मला त्यांच्यासाठी उद्या काहीतरी नवं नवं घेवून जावं लागेल हा ध्यास असायचा.सतत त्यांना नवं नवं हवं असायचं. त्यांच्यासाठी नवं शोधण्यामध्ये मला माझ्या जीवनाचा नवा अर्थ सापडला.

लेकरांच्या माध्यमातूनच वाचनाच्या अफाट जगात कधी प्रवेश झाला हेही कळलं नाही. या वाचनाच्या जगात अनेक शब्दप्रभू ,अक्षरशिल्पी मला मिळत गेले.पशु,पक्षी माती, झाडं आदींवर प्रेम करणारी लेकरं आता पुस्तकात रमु लागली व पुस्तकांवर प्रेम करू लागली .त्यांच्यासाठी जगाकडे पाहण्याची एक नवी खिडकी खुली झाली.किशोर, छात्रप्रबोधन, वयम  यासारख्या अनेक मासिकांमधून अनेक कवी ,लेखक माझ्या लेकरांसाठी

दररोज भेटीस येऊ लागली. 'कृतज्ञता हा उत्तम संस्कार आहे हा संस्कार बालपणची व्हायला हवा.' हे सांगणारे डॉ. आ ह साळुंखे सर, मुलांच्या पत्राला उत्तम दाद देणारे व मुलांच्या मनातील विश्वासाचा मोर नाचवणारे प्रवीण दवणे सर , मुलांसाठी उत्तम कथा पाठवणारे रा रं बोराडे सर , उत्तम सदाकाळ ,सुहास बारटक्के, फ मु शिंदे ,लीला शिंदे ,बबन शिंदे, गुलाब बिसेन ,राजन खान,पृथ्वीराज तोर,दासू वैद्य, आश्लेशा महाजन,बाबाराव मुसळे, इंद्रजित भालेराव,माणिक पुरी, आसाराम लोमटे, राजेश रेवले अशी कितीतरी मोठी माणसं माझ्या लेकरांना भेटत गेली. लेकरांसोबत माझाही समृद्ध होण्याचा प्रवास सुखकर झाला.

नौकरी म्हंट्ल की, बदली आलीच. शिक्षक म्हणून रुजू झालेल्या पहिल्या शाळेतून बदली झाली. बदली होऊन जाताना निरोपाप्रसंगी शाळेतील लेकरांच्या व गावातील अनुभवी डोळ्यातून माझ्यासाठी निघालेले कृतज्ञता अश्रू ही माझ्यातील गुरुजींचा सन्मानच होता. आपल्याला आपला गुरुजी सोडून जातोय तो आता कधीच आपल्याला परत शिकवायला येणार नाही या बालमनाच्या वेदनाही आज तशाच माझ्या हृदयाच्या एका कुपीत जपून ठेवलेले आहेत.आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर अशी कितीतरी लेकरं मला भेटत गेली ज्यांच्या सहवासामुळे माझे आयुष्य सुगंधित होत गेलं. पलखेड्यासारख्या सारख्या छोट्या गावात काम करताना तेथील आदिवासी बांधवांनी माझ्यावर जीव ओवाळून टाकला होता.तिथे काम करत असताना तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी सरांनीही आमच्या गावकऱ्यांच्या कार्यामध्ये सहभाग दाखवला.माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. सर्वात वरिष्ठ अधिकारी आपल्या कामाचा गौरव करतोय की, बाबत माझ्यासाठी मानाचीच होती. अनेक शिक्षक मित्र सहकारी बांधवांच्या सहवासात माझ्यातील गुरुजी घडत गेला.अने भली माणस वेळ प्रसंगी धावून आली .

जवळपास पूर्ण एक तप गोंदिया जिल्ह्यातील सेवा पूर्ण करून परभणी जिल्ह्यात प्रवेश केला. पारडी सारख्या तांड्यावरील शाळेत पोचताच मला पाहून एका चिमुरडीने म्हटलं, अरे बघा गुंडा गुरुजी आला. हे ऐकताच मी माझं निरीक्षण करू लागलो.त्या लेकराचं मी जास्त मनावर घेतलं नाही.जगात कुठेही गेलात तरी लेकरं एकसारखीच असतात हे मात्र नक्की. या शाळेत येताना मी आपसी बदलीने आलो होतो .मी आल्यामुळे या शाळेतील मुलांचा आवडता गुरुजी गेला होता.या नव्या गुरुजींमुळेच आपल्या गुरुजीला जावे लागले हा राग लेकरांच्या मनात होता. मला हे लेकरं स्वीकारायलाच तयार नव्हते. कुणीही माझ्याशी नीट बोलायचं नाही. अगदी सहा महिने या लेकरांनी माझ्यातील गुरुजींना आव्हान दिले होते. ह्या सहा महिन्यात माझ्यातील मी पणा, मीच सर्वात चांगला गुरुजी आहे. गोंदियासारख्या जिल्ह्यातून बदली करून येताना माझ्यासाठी अनेक डोळ्यांना अश्रू आवरता आले नाहीत हा कुठेतरी माझ्यातील अहमगंड होता तो कधी गळून हेही कळालं नाही. लेकरांच्या या वागण्यावरून जगातील एक मोठे सत्य समोर आलं लेकरं आपल्या गुरुजी वर प्रचंड प्रेम करतात.... गुरुजींना माया लावतात..... या शाळेत आल्यानंतर मला कळालं प्रेम करणारी मुलं या शाळेत आहेत... आणि आज अभिमानाने सांगावसं वाटतं खरंच ऊसतोड कामगारांची ही मुलं गुरुजीवर मनापासून प्रेम करतात.

लेकरांच्या सानिध्यात राहूनच शिक्षण क्षेत्राला या १७ वर्षात आपण काय दिलं...? याचे आत्मचिंतन करतानाही मला तितकाच आनंद आणि समाधान वाटत आहे. गुरुजी म्हणून सेवा करत असताना अनेक आनंदाच्या बिया लेकरांच्या रूपात मला रुजवता आल्या. ज्या येणाऱ्या काळात समाजासाठी आनंदाची झाड असतील आणि त्याचा मला सार्थ अभिमान असेल. लेकरांच्या उत्साहामुळे तितक्याच उत्साहाने मी गेली सतरा वर्षे उत्साहाने काम करतोय.मी माझ्या पेशाशी सदैव एकनिष्ठ राहिलो. याचं श्रेयही माझ्या या लेकरांनाचं जातं. जगाकडे पाहण्याची एक नवी खिडकी लेकरांसाठी सतत खुली करण्याचे काम पुस्तकाच्या माध्यमातून करता आलं आज या माध्यमातून २००० पुस्तकाचं वाचनालय तयार झालं.जे लेकरांसाठी अमूल्य ठेवा आहे. ज्ञानरचनावाद समजपूर्वक शिक्षण,

आनंदेरो झाड, गुरुजी, तू मला आवडला. हे तीन महत्वपूर्ण पुस्तकं माझ्या हातून लिहून झाली. जी शिक्षण क्षेत्रास दिलेली अनुभवांची शिदोरी किंबहुना संदर्भ ग्रंथच म्हणावे लागतील.जीवन शिक्षण, किशोर ,छात्र प्रबोधन, वयम, शिक्षण संक्रमण, शिक्षणयात्री, खेळ, झंप्या, आदींसारख्या अंकातून शिक्षण क्षेत्रातील महत्वपूर्ण बाबी गेल्या सतरा वर्षात मला मांडता आल्या. वेगवेगळ्या दिवाळी अंकातूनही मला शिक्षण क्षेत्रातील उपक्रम व चांगल्या बाबी मांडता आल्या. वेगवेगळ्या वर्तमान पत्रातून उपक्रमशील शाळा,आव्हान पेलनारी माणसं ,विद्यार्थी घडवताना, आनंदाच झाड अशी अनेक शैक्षणिक सदर लिहिता आली.अनेक शैक्षणिक कार्यशाळा,शिक्षण परिषदा,शिक्षण समेलनास हजेरी लावता आली.आपले म्हणणे तिथे सांगता आले.या माध्यमातून अनेक प्रेरणेचे स्त्रोत मिळत गेले.हे सर्व मला करता आले ते केवळ आणि केवळ माझ्या लेकरांमुळे. पावलोपावली माझ्या लेकरांनी माझ्यावर सुगंधी फुलांचीच उधळण केली अन् आयुष्य सुगंधित होत गेलं...

(युवराज माने हे जि.प.प्रा.शाळा पारडी ता.सेलू जि.परभणी येथे प्रा.शि.म्हणून कार्यरत आहेत.)

७५१७४७८५७०













निमित्त

# श्रीशिवरायांचा ३५० वा राज्याभिषेक दिन



प्रा.प्रशांत शिरूडे
ठाणे

प्रत्येक राष्ट्राला स्वतःचा एक इतिहास असतो. तो इतिहास नियमितपणे त्या राष्ट्राला प्रेरणा देत राहतो. त्या प्रेरणेमुळे ते राष्ट्र आत्मनिर्भर होते. आपला बराच मोठा इतिहास परकीयांनी लिहिला. तो म्हणावा तसा आपल्यासाठी प्रेरणादायी ठरला नाही. अनेक इतिहास संशोधक संशोधन करत असतात. आजही आपला खूप मोठा इतिहास व त्यातील अनेक संकल्पना संशोधकांच्या प्रतिक्षेत आहेत. एखाद्या घटकावर संशोधन करतांना आधी त्या घटकासंदर्भात किती आणि काय काम झाले हे समजून घेणे आवश्यक असते. एकदा का ते समजले तर त्या संदर्भात आपल्याला पुढे काय काम करायचे ते कळू शकते. अन्यथा आधी इतरांनी जे केले तेच आपण केले तर ते संशोधन नाही होत. त्याला मान्यता ही मिळत नाही. एखादी घटना जेव्हा आपण बघतो, ऐकतो किंवा वाचतो त्यावेळी आपल्या मनात त्या घटने संदर्भात जे चिकित्सात्मक भाव उत्पन्न होतात व त्यातून आपण जे निष्कर्ष काढतो त्यालाच साकल्याने संशोधन असे म्हणतात. इतकी संशोधन प्रक्रिया सोपी असते.

विज्ञान संशोधनात पुन्हा-पुन्हा प्रयोग करून त्यात आलेले निष्कर्ष पडताळून पाहता येतात. निष्कर्षात बदलही होत नाहीत. उदाहरणार्थ न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला हा शोध लागण्यापूर्वीसुद्धा वस्तू वरून खाली पडत होती आणि हा शोध लागल्यानंतर सुद्धा वस्तू वरून खालीच पडते. पृथ्वीतलावर कुठेही यात स्थळ, काळ परत्वे बदल नाही होत. न्यूटनने या घटनेकडे ज्या चिकित्सक दृष्टीने बघितले आणि त्यावर मंथन करून जो सिद्धांत मांडला त्यालाच आपण गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत म्हणतो.

पण इतिहास संशोधनात असे करता येत नाही. कारण ऐतिहासिक घटना या पूर्वी घडून गेलेल्या असतात. आपल्याला संशोधन करायचे म्हणून त्या पुन्हा घडवून आणता येत नाहीत. उदाहरणार्थ १७६१ मध्ये झालेले पानिपतचे युद्ध, एखाद्या इतिहास संशोधकाला, संशोधन करायचे म्हणून ते युद्ध पुन्हा होऊ शकत नाही. त्यामुळे इतिहासाचे संशोधन करताना ज्या घटकासंदर्भात संशोधन करावयाचे आहे त्या संदर्भातील उपलब्ध असलेले दस्तऐवज, त्या कालखंडातील दगड किंवा धातूच्या आज उपलब्ध असलेल्या वस्तू, युद्धाच्या ठिकाणी असलेल्या खुणा, वापरलेली हत्यारे, पत्रव्यवहारासाठी वापरलेल्या कागदाचा कालखंड किंवा त्याच्या शाईचाही कालखंड, तत्कालीन सामाजिक स्थिती, राजकीय घडामोडी, भौगोलिक परिस्थिती, शेती, व्यापार, दळणवळणाची साधने, गुहाचित्रे, लोकगीते, आख्यायिका, पोवाडे, श्रुती, स्मृती, इतर संदर्भ साहित्य आदींचे चिकित्सापूर्वक निरीक्षण करावे लागते. इतिहास संशोधन करतांना जसजशी नवीन ऐतिहासिक माहिती, दस्तऐवज मिळत जातात तसतशा जुन्या संकल्पना बदलून नवीन संकल्पना प्रस्थापित होत जातात. म्हणजेच जसे पुरावे उपलब्ध होत जातात तसे इतिहास संशोधनात बदल होत जातात. वस्तुत: कोणतेही

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

कोणत्याही ऐतिहासीक घटनेचा अभ्यास करताना, संशोधनाची वरील पद्धत वापरणे आवश्यक असते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यावर्षी ३५० वर्ष पूर्ण होत आहेत. शिवराज्याभिषेक ही घटना आपल्यासाठी, महाराष्ट्रासाठी, भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी झालेली ही एक ऐतिहासिक घटना आहे. म्हणूनच यावर्षी आपण हा राज्याभिषेक दिन या भूतलावर ज्या ज्या ठिकाणी शक्य त्या सर्व ठिकाणी दिव्यांची रोषणाई करत साजरा करत आहोत. स्वतः महाराजांनी आपल्या राजमुद्रेत

**मुद्रा भद्राय राजते** चा उल्लेख केला आहे. याचाच अर्थ ही मुद्रा जिथे उमटेल तिथे अभद्र काही असणार नाही, असा विश्वास समाजाला दिला आहे. हे रयतेचे, रयतेच्या कल्याणासाठी स्थापलेले आधुनिक जगातील पहिले राज्य आहे. छत्रपतींचा इतिहास हा तुम्हां आम्हां सर्वांसाठी नुसताच प्रेरणादायी नाही, तर वर्तमान काळातील आपल्या सर्व समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शकही आहे. शिवराज्याभिषेकाचे साडेतीनशेवे वर्ष आपण का साजरा करायचे? हा एक मोठा प्रश्न आहे. महाराजांचे अपूर्ण राहिलेले कार्य जर आपणास खऱ्या अर्थाने पूर्ण करावयाचे असेल तर, त्यांच्या अपूर्ण इच्छा, संकल्पना, स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी आपण हे वर्ष मोठ्या प्रमाणात उत्साहाने साजरा करणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे महाराजांचे विचार हे आज कसे मार्गदर्शक आहेत व ते अंगीकारण्यात या देशाचे कसे हित आहे, महाराजांच्या विचारातून हा देश आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून विकासाकडे कशी वाटचाल करेल. यावर प्रत्येकाने चिंतन, मनन करणे आवश्यक आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकाने करावे असे किंवा शाळाशाळांमधून शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून चिंतन व मनन व्हावे असे शिवछत्रपतींच्या कार्यकर्तृत्वासंबंधातील

विविध पैलुंचे दर्शन घडवणाऱ्या उपक्रमांचे विषय खालील प्रमाणे–

१)शिवराज्याभिषेकाचे अलौकिकत्व/ शिवराज्याभिषेक दिन का साजरा करायचा?

२)शिवाजी महाराजांनी १६४५ साली केलेल्या रायरेश्वराच्या मंदिरातील प्रतिज्ञा आणि त्याच वर्षी युरोपातील राष्ट्र–राज्य निर्मितीची वेस्ट फलिया मधील संकल्पना या दोन घटनांचा तुलनात्मक अभ्यास/चर्चा.

३)महाभारतात लाक्षागृहातून झालेली पांडवाची सुटका व आग्र्याच्या काळकोठडीतून महाराजांची सुटका या दोन घटनांमध्ये साम्य आणि भेद.

४)इतिहास संशोधन म्हणजे काय? त्याची गरज व महत्त्व

५)संशोधन म्हणजे काय?

६)इतिहास संशोधन व विज्ञान संशोधन दोघांमधील फरक – चर्चा करा.

७) इतिहासातून आपण नेमके काय शिकतो?

८) इतिहासाचा अभ्यास नेमका कसा करावा?

९) आम्हीं इतिहासातून काहीच शिकत नाही असे केंव्हा–केंव्हा वाटते?

१०) आमची पराभूत मानसिक मनोवृत्ती कशी झाली? त्यातून आम्हांला सर्वात प्रथम कोणी व कसे बाहेर काढले?

११) 'पूर्वी युद्धांमध्ये राजा किंवा सेनापती धारातीर्थी पडला तर त्याचे सैन्य रणांगणातून माघारी पळत' यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण आणि इतर भारतीय राजांचे धोरण यावर चर्चा करा.

१२) लढाईत पराभव होत असेल तर यशस्वी माघार कशी घ्यावी किंवा काही दगाफटका झालाच तर पुढे काय करावे याबद्दलचे महाराजांचे धोरण व इतर भारतीय राजांचे धोरण यावर चर्चा करावी.

१३) लोकमान्य टिळकांची शिवजयंती उत्सव का सुरू केला?

१४) छत्रपती शिवाजी महाराज झाले नसते तर?

१५) छत्रपतींचे प्रशासन व आजचे प्रशासन यावर चर्चा करावी.

१६) 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी'

ही उक्ती आजच्या संदर्भात किती परिणामकारक – चर्चा करावी.

१७) हिंदवी स्वराज्याचे उद्गाते – शहाजीराजे

१८) छत्रपती शिवाजी महाराजांचे भाषा शुद्धीकरणातील योगदान.

१९) स्वराज्यातील तिसरा डोळा बहिर्जी नाईकांची आजही गरज – चर्चा करा.

२०) छत्रपती शिवाजी महाराज – रयतेचे राजे.

२१)गड बोलू लागले तर!

२२) रायगड बोलू लागला तर!

२३) मी शिवाजी महाराज बोलतोय!

२४) राज्यव्यवहार कोष – छत्रपतींचे योगदान.

२५) शत्रूला महाराजांच्या योजनांचा अंदाज कधीच का आला नाही?

२६) आपल्या मते महाराजांचे एकमेवाद्वितीय वैशिष्ट्य कोणते?

२७) स्वराज्याच्या सीमांबद्दल महाराजांची संकल्पना.

२८) 'औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ध्येयापासून फारकत घेतली' या विधानावर चर्चा करा.

२९) निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू। अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी।।

३०) अखंड असावे सावध

३१) एक मावळा म्हणून माझे कर्तव्य.

३२) आपल्या गावाचा इतिहास.

**वार्षिक उपक्रमांचे नियोजन–**

जून–पूर्वपीठिका (व्याख्यान) शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा

जुलै– निबंध स्पर्धा.

ऑगस्ट–वक्तृत्व./विद्यार्थ्यांनी स्वतः पोवाडे तयार करणे व त्याचे सादरीकरण करणे, स्पर्धा/ऐतिहासिक विषयावर निमेशन किंवा व्हिडिओ बनविणे स्पर्धा.

सप्टेंबर–नाटक, एकांकिका, ऐतिहासिक प्रसंगांचे नाट्यीकरण/अभिवाचन स्पर्धा. (इतिहास विषयक ग्रंथांचे)

ऑक्टोबर– चित्रफित (जाणता राजा)

नोव्हेंबर–किल्ले बनविणे स्पर्धा. आपल्या गावाचा/परिसराचा इतिहास यावर व्हिडिओ बनविणे किंवा पीपीटी प्रेझेंटेशन स्पर्धा,

डिसेंबर–प्रदर्शन (किल्ले, ऐतिहासिक क्षेत्रे, ऐतिहासिक प्रसंग, ऐतिहासिक युद्धांची चित्रे, नेते, पोवाडे. जानेवारी– – सहली, दुर्ग भ्रमंती, ऐतिहासिक किल्ल्यांवरील (प्रत्यक्ष भेटी– चित्रफित, मेकअप आर्टिस्ट.

फेब्रुवारी–प्रश्नमंजुषा, किल्ल्यांवरील स्वच्छता मोहीम, ऐतिहासिक प्रसंगांचे (पुस्तकांचे) अभिवाचन.

एप्रिल–समारोप श्रमपरिहार

वर्षभर आपण काय केले?

काय करायला हवे होते?

काय राहून गेले?

इतर उपक्रम–––

१)शिवचरित्रावर व्याख्याने

२) शिवचरित्रावर कथाकथन

३)अल्बम बनविणे

४)पीपीटी प्रेझेंटेशन

५)शिवकालीन शस्त्र प्रदर्शन.

हे आपलं पहिलं पाऊल असेल,

सर्वजण मिळून वर्षभरात आपल्या मनाला समाधान,आनंद वाटेल असं छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचं ३५०–५१ वे वर्ष साजरे करूया.

(प्रा.प्रशांत शिरूडे हे व्दे.रा.कोतकर माध्य.विद्यालय डोंबिवली जि.ठाणे येथे कार्यरत आहेत.)

९९६७८१७८७६

# आनंददायी शिक्षणासाठी...



किरण दशमुखे
नाशिक

मूल घरच्या सुरक्षित वातावरणातून सर्वप्रथम बाहेर पडते आणि ते शाळेच्या प्रांगणात पहिले पाऊल टाकते. यावेळी त्याच्यासोबत घरचे कुणी नसते. विशेषत: आईवडिलांपासून ते प्रथमतः च एकटे असते. शाळेच्या नवीन विश्वात आलेले असते. यामुळे घरचे सुरक्षित वातावरण आणि नव्याने पाहत असलेला शालेय परिसर याची ते तुलना करू लागते.बालकाला सर्वप्रथम सुरक्षितता हवी असते. आपण येथे सुरक्षित आहोत ना,या गोष्टीचा ते कानोसा घेते. घरी त्याच्या जिव्हाळ्याची माणसं असतात. तेव्हा शाळेत नव्याने प्रवेश करणाऱ्या बालकाला देखील शिक्षकाचे प्रेम मिळाले तर बालक शाळेच्या नवीन वातावरणात देखील लगेच रमून जाते. त्याला जिव्हाळा हवा असतो. अशी जिव्हाळा, आपुलकी, त्याचा स्व जपणारी माणसं मिळाली की बालक आपसुकच त्या पर्यावरणात रमते. हळूहळू ते सकारात्मक प्रतिसाद देऊ लागते. शाळा देखील त्याला आता त्याचे ' सेकंड होम ' वाटू लागते. शाळेत नव्याने येणाऱ्या मुलाच्या मनात खूप प्रश्नांचे मोहोळ उठलेले असते. त्याच्या वयाच्या तीन,चार किंवा पाचव्या वर्षी ते घराची पायरी ओलांडून, एक सुरक्षित जागा सोडून शाळेच्या नव्या वातावरणात येते. तेव्हा त्याची एक अनामिक भीती त्याच्या मनात असते. ही भीती एकदा नष्ट झाली की, मूल स्वतःहून शाळेत रमते. ते नियमित शाळेत यायला प्रवृत्त होते. आणि महत्त्वाचे म्हणजे असे झाले की, ते खूप आनंदाने अभ्यास करू लागते. त्याची अध्ययनाची गती वाढते. ज्ञान संक्रमणाचा वेग वाढतो. मूल लवकर शिकते. त्याची ज्ञानधारणा लवकर दृढ होते. या सर्व गोष्टीसाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे, ती म्हणजे शिक्षक प्रेमळ असला पाहिजे. शिक्षकांच्या जीवनात किती ही कष्ट, दुःख,विवंचना असल्या तरी बालकापुढे तो नेहमी आनंदी,हसतमुख असला पाहिजे. शिक्षकाला मूल दिसलं की, त्यांनी आपले प्रौढत्व विसरून मूल झाले पाहिजे. पूज्य विनोबाजी म्हणतात, ज्याला शिक्षण घ्यायचे आहे त्यांनी मोठे झाले पाहिजे; आणि ज्याला मुलांना शिकवायचे आहे त्याने लहान मूल झाले पाहिजे.

शिक्षक मुलात मूल होऊन मिसळेल तर मुले आनंदाने शिकतील. त्यांना भीती वाटणार नाही.नव्याने शाळेत दाखल झालेल्या मुलाला काय शिकवावे? विनोबाजी म्हणतात, मुलाला प्रथम चित्र शिकवावे. मुलांना चित्रांची भाषा लवकर कळते. चित्र हा त्यांचा आवडीचा भाग असतो. यामध्ये ते रमतात. त्यांचे रंजन होते. त्यांना खूप आनंद मिळतो. या दृष्टीने शिक्षकाने चित्रमय पद्धत अवलंबवावी. ए फॉर अँप्पल शिकवताना जर सफरचंदाचे स्केच काढले तर तो संबोध मुलांना लवकर लक्षात येतो. तसेच मराठी मुळाक्षरे शिकवताना अ- अननसाचे चित्र काढावे. अशा प्रकारे इंग्रजी मुळाक्षरे ए टू झेड व मराठी मुळाक्षरे अ ते ज्ञ यांची चित्रे काढण्याचे शिक्षक शिकला तर मुले आनंदाने ज्ञानग्रहण करतात. तसेच चित्रांची सहसंगती लावल्याने त्यांच्या लवकर लक्षात राहते.

दुसरी गोष्ट साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे, जो करील मनोरंजन मुलांचे, जडील नाते तयाशी प्रभूचे! मुलांना रंजकतेने शिकवावे.मूल शाळेत रमेल,त्याची थोडी करमणूक होईल, याकडेही लक्ष पुरवावे. यासाठी मुलांना बडबड गीते तालासुरात म्हणून दाखवावीत. त्यांनाही म्हणायला लावावीत. मुलांना गाणी खूप आवडतात. पुन्हा पुन्हा म्हटल्याने त्यांचे मुखोद्गत होते. त्याचा एक चांगला परिणाम त्यांच्या अध्ययनावर होतो. मुले आनंदी होतात.गाणी कृतीयुक्त पद्धतीने म्हणावीत.

त्याचप्रमाणे गोष्टी हा देखील मुलांचा आवडीचा प्रांत असतो. शिक्षकांनी मुलांना भरपूर गोष्टी सांगाव्यात. गोष्ट सांगण्यात शिक्षक तरबेज असावा. सांगताना नाट्यीकरण करता आले पाहिजे. आवाजातील आरोह-अवरोह, चेहऱ्यावरील हावभाव, अंगविक्षेप हे देखील जमले पाहिजे

गोष्टीचा खूप सकारात्मक परिणाम मुलांच्या मनावर होतो. मुलांच्या मनाची जडणघडण यातून होते. गोष्टीतील बोध मुलांच्या मनावर चांगला सकारात्मक परिणाम करते.मूल घडत जाते. संस्कारी बनत जाते.

वर्गात मूल आल्यानंतर केवळ आपणच बोलत राहणे,मुलांना संपूर्ण वेळ हाताची घडी, तोंडावर बोट,एका जागी बसवून ठेवणे,या गोष्टी केल्यास मूळ कंटाळते. मुलांना थोड्याफार हालचाली आवश्यक असतात.कडक शिस्तीच्या नावाखाली खूपच काटेकोर बंधने घालून चालत नाही. मुलांना काही प्रश्न विचारून त्यांना बोलते करावे. मुले पुढे येऊन बोलू लागतात. ती व्यक्त होतात. त्यांना तुम्हाला काही गोष्टी सांगायच्या असतात,त्यासाठी तुम्ही थोडा वेळ काढून त्यांच्या गोष्टी ऐकून घेतल्या पाहिजेत.सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षकाच्या मनात प्रत्येक मुलाबद्दल आदर असावा. मग ते हुशार असो अथवा गतिमंद. दोघांबद्दल त्याला सारखाच आदर वाटला पाहिजे. शिक्षकांनी मुलाबद्दल प्रेमाची, जिव्हाळ्याची भावना ठेवली तर मूल देखील शिक्षकाचा आदर करू लागते.

मुले बऱ्याचदा पालकांचे ऐकत नाहीत. ते आपल्या शिक्षकाला प्रमाण मानते.आदर्श मानते. यासाठी मुलांना चांगल्या सवयी व शिस्त लावण्याची जबाबदारी आपसूकच शिक्षकांवर येते.शिक्षकांनी अधून मधून मुलांना चांगल्या सवयी समजावून सांगाव्यात.त्यांच्या समोर आपली कृती देखील आदर्श राहिल याचे.नेहमी भान ठेवावे.अन्यथा मुले शिक्षकाची नक्कल करतात. मुलाच्या चांगल्या कृतीचे कौतुक करावे.मात्र चुकीचे वर्तन केल्यास त्याला रागवावे. मात्र हा राग मातृहृदयी असावा. त्याला शारीरिक शिक्षा करू नये. त्याला आपली चूक लक्षात आल्यास पुन्हा प्रेमाने जवळ घ्यावे.पाठीवर हात ठेवून अशी चूक करू नकोस म्हणून प्रेमळ शब्दात समजून सांगावे.

आपल्यासमोर बसलेली बालके किलकिल्या डोळ्यांनी आपल्याकडे आशेने बघत असतात. ते चातकाप्रमाणे ज्ञानबिंदू प्राशन करण्यासाठी उत्सुक असतात. आपण आपल्या उदासीनतेणे त्यांचा अपेक्षाभंग करू नये.उद्या काय शिकवायचे याचे नियोजन असलेच पाहिजे. तसे नसेल तर आपली अवस्था समुद्रात भरकटलेल्या नावे प्रमाणे होते. तसे करू नये. कोणताही पाठ शिकवण्यापूर्वी त्यावर चिंतन करावे. तो विद्यार्थ्यांना सहज सुलभ पद्धतीने कसा शिकविता येईल यावर विचार करावा. त्यासाठी शक्य असल्यास अध्यापन साहित्य बनवावे. कृती साधन महत्त्वाची भूमिका बजावते. पाठ, कविता शिकवल्यानंतर शक्य असल्यास मुलांना त्या कवी, लेखकाशी मोबाईल वरून संभाषण साधून द्यावे; किंवा त्या लेखकाची कलाकृती मुलांना दाखवावी. त्याबद्दल वेगळी विशेष माहिती द्यावी. यामुळे मुलांचा उत्साह वाढतो. थोडक्यात शिक्षकांनी आपला आळस झटकला, निष्काळजीपणा कमी केला तर सर्व काही सहज शक्य आहे. चला तर मग नवी पिढी घडवण्यासाठी आपण सारे सज्ज होऊया...

**(किरण दशमुखे हे स्वामी विवेकानंद बालविकास मंदिर,चौगाव ता.बागलाण जि.नाशिक मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत)**

-९४२०८८९५७५

कथा

# ध्येयाचा ध्यास



एकनाथ आव्हाड
मुंबई

'राक्या ए राक्या, येतोस का खेळायला?' अभ्यासाला बसलेल्या राकेशला मित्रांचा आवाज आल्याबरोबर त्याची घराबाहेर पडण्यासाठी चुळबूळ सुरू झाली. आईच्या हे लक्षात आले. ती लगेच म्हणाली, 'राकेश, घराबाहेर पाऊल टाकशील तर याद राख. आधी गृहपाठ पूर्ण कर. सहामाही परीक्षेत जेमतेम काठावर पास झाला आहेस तू. आता येणाऱ्या वार्षिक परीक्षेलाही तेच करायचे आहे का?' आई राकेशवर ओरडलीच आणि दाराबाहेर जाऊन ती राकेशच्या मित्रांनाही म्हणाली, तो नाही येणार रे खेळायला. चला जा बरं इथून. अभ्यास करू द्या त्याला. सारखा आपला नुसता खेळ खेळ खेळ. मग अभ्यासाला नाहीच मिळत वेळ. चला पळा.' मुलं निघून गेली. राकेश हिरमुसला. पुस्तकात डोके खुपसून निमूट अभ्यासाला बसला. पण आता कसला अभ्यास. त्याचं मित्रमंडळ तिकडं मैदानावर क्रिकेट खेळणार आणि हा घरी एकटा बसून अभ्यास करणार. हे कसं काय शक्य आहे?

ङ्गए आई, थोडा वेळ जाऊन येतो ना गं बाहेर. लवकर परत येईन. अभ्यास करून जाम कंटाळा आलाय मला.'

यावर आई काहीच बोलली नाही.

राकेशला वाटलं, सहामाही परीक्षेचा आपला रिझल्ट कमी लागल्यापासून आई आपल्यावर फारच रागावतेय. बाबाही आपल्या सर्व गोष्टींवर बारीक लक्ष ठेवून असतात आणि सारखा आपला, अभ्यास कर अभ्यास कर म्हणून आपल्यावर ओरडत असतात. आहे मी थोडा अभ्यासात कमजोर म्हणून काय सारखं सारखं रागवायचं होय. जाऊ दे. हल्ली आईबाबा मला समजूनच घेत नाही.

राकेशचा चेहरा आईने बरोबर वाचला. ती जरा नाराजीनेच म्हणाली, 'बरं जा. लगेच तोंड पाडून नको बसू. नाहीतरी आता तुझं लक्ष अभ्यासाकडे थोडंच लागणार म्हणा. पण हे बघ, लवकर घरी परत ये. तुझे बाबा येतीलच इतक्यात. अभ्यास केला नाही म्हणून पुन्हा ते तुला ओरडतील. मग मला सांगू नकोस हां. आणि हो, आल्यावर आधी गृहपाठ पूर्ण करायचा. कबूल?'

'हो आई; नक्की.'

राकेशची कळी खुलली. तो लगेच मैदानावर जाण्यासाठी पटकन घराबाहेर पडला. क्रिकेट म्हणजे राकेशचा जीव की प्राण. या खेळात त्याला गतीही चांगली होती. गती चांगली असल्यामुळे लवकरच त्याने या खेळात प्रगतीही साधली होती. त्यांचा टीमचा तो कॅप्टन झाला होता.

आईला हे सारं माहीत होतं. पण तिला वाटत होतं, जसा हा हुशारीने, चपळाईने क्रिकेट खेळतो; तसाच हुशारीने, मन लावून त्याने अभ्यासही करायला हवा.

राकेशचं एक आहे, तो अभ्यासात मागे पडत असला तरी दुसऱ्यांना मदत करण्यात तो मात्र नेहमी पुढे असतो. शाळेच्या तर प्रत्येक कामात त्याची तत्परता दिसून येते. शाळेच्या मैदानावर माती टाकायची असेल किंवा मैदान

स्वच्छ करायचे असेल, तर राकेश नेहमीच सर्वांच्या पुढे असायचा. शाळेच्या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात तर त्याचा उत्साह ओसंडून व्हायचा. त्याला झाडांबद्दल अमाप प्रेम. झाडांनाही आपल्यासारखा जीव असतो; त्यांची काळजी आपण घेतली पाहिजे, असं तो अनेकदा आपल्या मित्रांना सांगायचा. तीन गोष्टी राकेशला खूप आवडायच्या –एक क्रिकेट, झाडे आणि तिसरे म्हणजे गाणे. त्यामुळे त्याचा शाळेच्या मैदानावर, संगीत कला विभागात आणि झाडांच्या सहवासात अधिक वेळ जायचा. म्हणतात ना, आवड असली की सवड आपोआप मिळते. पण यामुळे त्याचा अभ्यास मात्र साहजिकच मागे पडायचा.

यावर्षी त्याच्या मुक्तानंद हायस्कूलमध्ये नेहमीप्रमाणेच आंतरशालेय गायन स्पर्धा आयोजित होणार होत्या. या स्पर्धेकडे अनेक शाळांचे लक्ष असायचे. बक्षीस मिळवण्यासाठी गाणाऱ्या मुलांची तर खूपच चुरस लागते. अनेक गाणारी मुले तर या स्पर्धेच्या दृष्टीने वर्षभर गाण्याचा रियाज करीत असतात. राकेशला क्रिकेट जसे खेळायला, पाहायला आवडते तसेच गाणेही त्याला गायला आणि ऐकायला आवडते.

त्याच्या आठवी 'ब'च्या वर्गात गाणारे विद्यार्थीच जास्त. तेही एक से बढकर एक. म्हणून तर त्यांच्या वर्गाला 'गाणारा वर्ग' म्हणूनच सारे ओळखायचे. प्रत्येकाला पोवाडे, लावणी, भावगीत, भक्तिगीत, गझल, कोळीगीत अशा आपापल्या गायन प्रकारात गायची सवय होती. या गायन स्पर्धेत प्रत्येक जण आपली खासियत असलेला गायन प्रकारच स्पर्धेसाठी निवडणार होता. त्यामुळे समूहगीत गाण्यासाठी कोणीच तयार नव्हते. शिवाय समूहगीताचा चषक कुणा एकट्या दुकट्याला न मिळता तो शाळेलाच मिळायचा. राकेशने मात्र ठरवले, यावर्षीच्या स्पर्धेत समूहगीताच्या स्पर्धेसाठी आपल्या वर्गातील मुलांचा ग्रुप तयार करायचाच आणि उत्कृष्ट समूहगीतासाठी असलेला चषकसुद्धा शाळेसाठी मिळवायचाच.

राकेश गाणाऱ्या प्रत्येक मुलामुलीला भेटला. आपण स्वतःसाठी नेहमी बक्षीस मिळवतोच पण यावेळी शाळेसाठी आपण बक्षीस मिळवूया. शाळा आपल्यासाठी खूप करते आपण आता शाळेसाठी काहीतरी करूया, असे त्याने प्रत्येकाला सांगितले.

आणि काय आश्चर्य, मुलांनी त्याचे ऐकले. आपापले गाणे बाजूला ठेवून सर्वजण समूहगीताच्या स्पर्धेसाठी एकत्र आले. तयारी करू लागले.

'देश हाच देव आपुला, मानू जीवना
सत्य हाच ध्यास अवघा, जाणू जीवना

हे समूहगीत स्पर्धेसाठी निवडले गेले. स्पर्धेचा दिवस उजाडला. मुलांनी हे समूहगीत अतिशय सुंदर प्रकारे सादर केले आणि पहिल्या क्रमांकाचे बक्षीसही पटकावले.

राकेश तर त्या दिवसापासून रोज एकदा तरी म्हणायचा,

समूहगीत गाताना, एक होतो सारा वर्ग
गाणाऱ्या वर्गाचा मग, होऊन जातो स्वर्ग''

समूहगीतासाठी राकेशने केलेली धडपड शिक्षकांमार्फत मुख्याध्यापक वावेकर सरांच्या कानापर्यंत पोहोचलीच.

राकेशचे गाणे, क्रिकेट आणि झाडांवरचे प्रेम हे गुण शाळेला माहीत होते. पण त्याच्याकडे अभिनयगुणही आहे; ही गोष्ट वेशभूषा स्पर्धेच्यावेळी शाळेला कळली.

त्याचे काय झाले, शाळेने वार्षिक वेशभूषा स्पर्धा आयोजित केली होती. त्यात राकेश चक्क उंच झाड होऊन आला.

अगदी हिरवेगार झाड. व्यासपीठावर आल्यावर त्याने त्याचं मनोगत अभिनयातून साकारले. हातांच्या फांद्या करून तो म्हणाला,

'मी आहे झाड, ओळखा माझं नाव
ओळखून घ्या माझ्या, मनातला भाव
उंच माझी वाढ, सावली मात्र छोटी
तरीसुद्धा फायद्याची, गोष्ट सांगतो मोठी
जरा निरखून पाहा, तुम्ही माझे रूप
फांद्या छोट्या जरी, उपयोगी त्या खूप
गरिबांच्या झोपड्यांना, झावळ्यांनी झाकतो
खोडाचा खांब करून, आधार मी देतो
शहाळ्यात पाणी, नारळही आणतो
गोड गोड खोबरे, तहानभूक भागवतो
कितीतरी वस्तू, माझ्यातून बनवतात
घरीदारी रोजच त्या, वापरल्या जातात

उणेदुणे काढून मी, कधीच ना रडतो
उंच वाढत जाऊन, आकाशाला भिडतो'

सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. मुलं तर तालासुरातच म्हणाली,

'हा आहे झाड, नाव याचं माड
नका बरं म्हणू, कुणी याला द्वाड'

राकेशने केलेला झाडाचा पेहराव आणि सादर केलेले झाडाचे मनोगत परीक्षकांना खूप आवडले. राकेशला प्रथम क्रमांक मिळाला.

शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन जवळ येऊन ठेपले होते. अभ्यासात हुशार असणाऱ्या मुलांचे सत्कार होणार होते. मुख्याध्यापकांनी राकेशला त्या दिवशी आईबाबांसह शाळेत यायला सांगितले. 'काय विशेष सर?' असे राकेशने विचारताच मुख्याध्यापक वावेकर सर म्हणाले कळेल त्याच दिवशी.अखेर कार्यक्रमाचा दिवस आला. राकेश आईबाबांना घेऊन सभागृहात दाखल झाला. त्याला कळेना, आईबाबांना का बरे बोलावले असेल?

कार्यक्रम सुरू झाला. प्रास्ताविक झाल्यानंतर मुख्याध्यापक वावेकर सर बोलण्यासाठी उभे राहिले. म्हणाले, आमच्या शाळेचा विद्यार्थी राकेश अभ्यासात थोडा मागे असला तरी इतर गोष्टींत तो सर्वांच्या पुढे आहे. तो अभिनय छान करतो, क्रिकेट मस्त खेळतो आणि झाडांची काळजीही जिवापाड घेतो. आणि विशेष म्हणजे एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी सगळ्यांना एकतेच्या बंधनात बांधून ठेवतो. मार्कांची टक्केवारी हीच आयुष्याची इतिकर्तव्यता न मानता सद्गुणांची जोपासना करतो. म्हणूनच शाळेने आदर्श विद्यार्थी म्हणून राकेश सुमती सदानंद सरनोबत या विद्यार्थ्याची निवड केली आहे. त्याने त्याच्या आईबाबांसह व्यासपीठावर यावे आणि पाहुण्याच्या हस्ते हा सन्मान स्वीकारावा. आपल्या मुलाच्या कर्तृत्वामुळे त्याच्या नावासोबत आपलेही नाव घेतले गेले म्हणून आईबाबांचेही डोळे भरून आले, अभिमानाने ऊर भरून आला आणि सभागृहात टाळ्यांचा पूर तर अखंड वाहत होता.

-९८२१७७७९६८

# तेजशलाका

स्वप्नांत रमत असताना
ध्येयाचाच ध्यास धरतो
आंतरिक शक्तिनिशी
सारे सर्वोत्तमच करतो

अडथळ्यांच्या शर्यतीत
मर्यादा रोखत नसतात
संकटांच्या सावटातही
फक्त संधीच दिसतात

जगातली एकही समस्या
माझ्यापेक्षा मोठी नाही
माझी प्रबख इच्छाशक्ती
हिमालयाहून छोटी नाही

विचारांचे होकायंत्रच
आयुष्याला दिशा दाविते
निर्भयता नि सजगताच
जीवनाला वळण लाविते

अडवणूक करणाऱ्या गोष्टी
सगळ्या काल्पनिक असतात
भोवतालच्या निसर्गशक्ती
मनोबल वाढवत असतात

डॉ.सुरेश सावंत नांदेड
९४२२१७०६८९

# मानवी जीवनाच्या उध्दाराचा केंद्रबिंदू म्हणजे सुसंस्कारित शिक्षण



वंदना श्रावण भवर
छत्रपती संभाजीनगर

शिक्षणाने माणसाच्या जीवनातील वेगवेगळ्या सूप्त गुणांना वाव मिळतो व तसेच माणसाच्या उन्नतीचे उत्थानाचे आणि उत्कर्षाचे अनेक मार्ग निर्माण होतात. संस्काराने या मार्गांना वेगवेगळे आयाम प्राप्त होऊन प्रगल्भता निर्माण होते.आपली मुले हीच आपली खरी संपत्ती आहे .बाल वयात आपल्या मुलांना योग्य ते मार्गदर्शन मिळणे ,योग्य वळण लावणे यालाच संस्कार म्हणतात. जर पशु पक्षांना शिकवलं तर ते देखील मनुष्याप्रमाणे वागू लागतात. संत श्री.ज्ञानेश्वर महाराज,संत श्री.तुकाराम महाराज,संत श्री.नामदेव महाराज ही सुद्धा कधी काळी अजान बालकेच होती पण, योग्य संस्कारामुळेच ती देवपदाला ,संत पदाला पोहोचली. आपल्या मनाला विचारांची, विचाराला ज्ञानाची ,ज्ञानाला सत्कर्माची आणि या सर्वांना शेवटी बलोपासनेची जोड देणे म्हणजे संस्कार होय.आपल्या लहान मुलावर संस्कार करण्याची जबाबदारी आपणा सर्वावर आहे .आपली मुले सर्व गुण संपन्न व्हावीत ,त्यांना चांगले उच्च शिक्षण देऊन सुशिक्षित व सुसंस्कारित व्हावी असे आपल्याला वाटते परंतु , तसे अपेक्षेप्रमाणे घडले नाही तर आपण चिडचिड करायला लागतो. आपली मानसिकता खराब व्हायला लागते.शिक्षणात काही अडचणी येतात याचा आपण फारसा विचार करतं नही आणि त्रागा करायला लागतो.सद्या मुला- मुलींना सोशल मीडियाचे फार जास्त आकर्षित निर्माण झालेलं आहे.त्यामुळे त त्यांचा स्वभाव चिडका, रागीट व हट्टी होत आहे. मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नाही व परिणामतः अनेक प्रश्न परिवारात निर्माण होत आहे. कुटुंबात पालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व गोष्टीचा दूरगामी परिणाम समाजात झपाट्याने वाढत आहे. या मुळे सामाजिक गुन्हेगारी, स्व:



मग्नता, हेकेखोर पणा, आदी समस्यांचे प्रमाण वाढत आहे .मुलांचे बालगुन्हेगारी चे प्रमाण वाढत आहे.

याचा अर्थ असा की, शिक्षणाने माणूस केवळ शिक्षित होतो परंतु,संस्कृत होतोच असे नाही. ही समाजात आढळणारी विपरीत परिस्थिती लक्षात घेऊन निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांच्या निर्मूलनासाठी समाजात वेगवेगळ्या सेवा मार्गातूनअनेक मुलामुलींना संस्काराचे,नीती मूल्याचे शिक्षण, देण्यात येत आहे. त्याना मार्गदर्शन केले जात आहे. एक आदर्श व्यक्तिमत्व, एक सुजाण - जागरूक नागरिक या देशात घडविणे हीच या मागची बलोपासना. आपण बघतो कुंभार ज्याप्रमाणे चिखलाच्या मातीचा गोळा घेऊन तो मडकी घडवत असतो

तसेच,ही आपली मुलं चिखलाच्या गोळ्याप्रमाणे सुकोमाल, मृदू, मुलायम,मुसमुशीत आणि निरागस आहे. आपण जसे त्यांना संस्कार करू तसे ते घडणार आहे. श्यामची आईम्हंटले की साने गुरुजी आठवतात.श्यामची आई  श्यामला म्हणायची की, बाळा पायाला माती,घाल लागू नये म्हणून जसे पायाला जपतो तसे,आपल्या मनालाही घाण लागू नये देऊ नकोस .म्हणजे, आपले मनही सुसंस्कारित आणि स्वच्छ चरित्र पूर्ण असले पाहिजे, असे बाळकडू संस्कार श्यामच्या आईने श्यामला दिले. त्यामुळे श्याम अर्थात साने गुरुजींचे उज्वल, भव्यदिव्य चरित्र निर्माण होऊ शकले. अनेक शतकं गेली तरी आजही श्यामच्या आईने श्याम वर रुजलेले सूसंस्कार  तमाम पालकांच्या, बालकांच्या आणि मुलांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. श्यामच्या आईच्या शिक्षणाचा, सूसंस्काराचा, चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व निर्माण करण्याचा वसा आणि वारसा अनेक पिढ्यांपासून नवीन काल जन्मलेल्या पिल्ला पर्यन्त जपला जावा असा प्रयत्न सदैव आपण होत असताना पाहतो. आज पर्यंत सतत चालू आहे याचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे श्यामच्या बालमनावर त्याच्या आईने रुजवलेले बालसंस्कार आणि त्याच संस्काराच्या बळावर शामने आपल्या जीवनात त्या सू संस्काराचे केलेले अवलोकन आणि  आचरण  होय.ही महिमा आणि किमया आहे संस्काराची. प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्याशी  सतत संवाद साधावा, पाल्यांच्या सुप्त गुणांचे तोंड भरून कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे ही पालक म्हणून आपली जबाबदारी आहे .मुलाच्या संगती -सोबती मित्र-मैत्रिणीशी आदराने बोलावे. आपल्या मुलात आणि त्यांच्या मित्र परिवारात मैत्रिभाव निर्माण करावा.आपल्या पाल्याचे मित्र-मैत्रिणीकिती योग्य व अयोग्य या बाबत समजूतदार पणे सुसंवाद साधावा जसे,श्रीकृष्ण व अर्जुनाची मैत्री हे एक उत्तम उदाहरण म्हणून आपण आपल्या पाल्यांना सांगू शकतो. चांगल्या आणि वाईट संगतीचा परिणाम कसा होऊ शकतो याचे अनेक  बोधपर दाखले आपण दाखऊ शकतो. आपल्या पाल्यांच्या जीवनात सुसंगती सदा घडो याचं बीज मुलांच्या मनात पेरणं योग्य वेळी त्या बिजाचं रोपण करणे ही आणि संगोपन करुन संवर्धन करणे क्ष

ही काळाची गरज आहे.. नुकताच शिवाजी महाराजांचा ३५० वा शिवराज्याभिषेक दिन आपण मोठ्या थाटामाटात अन भव्य दिव्य स्वरूपात अखिल जगात साजरा झाला. महाराष्ट्रातील शिव अभ्यासक आणि थोर वक्ते. श्री. बानगुडे पाटील आपल्या भाषणात असा दाखला देतात की,छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी रायगडावरती दोन मोठ मोठाले हत्ती अंबारित शिवाजी महाराजाची स्वारी निघाली होती. मोठ्या गाजावाजात छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. सदरील राज्याभिषेकासाठी अनेक देशातील अनेक मान्यवर  आणि इंग्रज सुद्धा उपस्थित होते . छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होत असताना प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न निर्माण होत होता की, एवढ्या मोठ्या रायगडावरती हे हत्ती आणले कसे असतील? सर्वांना याचे आश्चर्य वाटत होते . शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि काही इंग्रज अधिकाऱ्यांनी न राहून  प्रश्न विचारला की,एवढ्या मोठ्या गडावरती हत्ती कशा पद्धतीने आणले असतील.?तर ही किमया साध्य केली होती  मॉसाहेब जिजाऊ त्यांच्या कौशल्यपूर्ण दूरदृष्टी नियोजनाने.त्यांना अपेक्षित होते की जेव्हा आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करायची वेळ येईल तेव्हा तो रायगडावर करण्यात यावा आणि या राज्याभिषेकाला घोडे हत्ती उंट असे अनेक साज संगत असावी त्या अनुषंगाने हत्ती लहान असतानाच मॉसाहेब जिजाऊनी सर्व  व्यवस्था करुन हत्तींना रायगडावरती आणले होते . आऊ साहेब जिजाऊंना विश्वास होता की,'आपला शिवबा आपलं हिंदवी स्वराज्य निर्माण करेल स्वतःचं राज्य निर्माण करेल आणि आपण स्वतः शिवाजी बाल शिवाजीचा शिव राज्याभिषेक आपण करू. त्याचं पूर्व नियोजन म्हणून जिजाऊ माँ साहेबांनी हत्ती अगोदरच गडावर नेऊन ठेवले होते. त्याचा अर्थ असा की माँसाहेब जिजाऊंचे असणारे सूक्ष्म नियोजन, अजोड कल्पना शक्ती आणि दूरदृष्टीकोनाला तोड नाही.त्याच अनुषंगाने आपल्या माँसाहेबांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या जीवाची बाजी प्राण पणाला लावून हिंदवी स्वराज्य निर्माण केले. आणि ३२ मण सिंहासनावर छत्रपती शिवाजी महाराज

सिंहासनाधीश्वर झाले. हे सर्व सिद्ध झाले बालसंस्काराच्या संस्काराच्या बळावरती जर आपणासही आपला मुलगा–मुलगी पाल्य हा शिवाजी महाराजांसारखा पराक्रमी, शुर, विर, तेजस्वी, ओजस्वी, आणि धाडसी व्हावा, एक सुसंस्कारित, सुजाण नागरिक व्हावा ,यशस्वी व्हावा आणि आपल्या माय माती आणि मातृभूमीचं नाव उज्वल करावे असे वाटत असेल तर, या बालपणावर संस्काराचे बीजारोपण करुन त्यांचे सृजन,संगोपन आणि संवर्धन करणे हे फार गरजेची बाब आहे. काळ हा स्पर्धेचा आहे. या स्पर्धेच्या युगात संतती, संगती आणि संपत्ती ही आपत्तीत कामा आली तरच ती कामाची आहे अन्यथा काही कामाची नाही. संतती, संगती आणि संपत्तीला एकसंध ठेवण्याचं काम संस्काराचा धागा करतो.जर संस्कार शुद्ध आणि चांगले असेल तर संपत्ती वृद्धिंगत होते तसेच, संततीही प्रगल्भ आणि प्रभुत्व पूर्ण होते आणि शुद्ध सात्विक भाव असेल तर संगतीही माणसाच्या जीवनाला दिशा देणारी ठरू शकते. त्यामुळे आपल्या पाल्यांना शिक्षण तर हवेच परंतु शिक्षणा सोबतच संस्काराचं बाळकडू पाजणं ही आपली जबाबदारी आहे.या बाळकडूच्या जोरावरच उद्याचा सुजाण, सुखी समाधानी नागरिक निर्माण होऊन समृद्ध, सौख्य लाभलेला सर्वांगसुंदर समाज निर्माण होणार आहे.या सुखी समाधानी,सुंदर, सुशील, सुसंस्कृत आणि सर्व गुण संपन्न समाजाचा पाया म्हणजे संस्कार होय.. सुसंस्कार होय.

–९७६५४७६२६९

# बावनकशी सोने इ.पहिली

पहिलीचा वर्ग म्हणजे मुलांचा पाया
शिक्षक म्हणजे जणू आईची छाया,
पाऊल पडता चिमुकल्यांचे वर्गात
लकेर उठावी जशी सप्तसुरात!!
ध्यास हा, अभ्यास हा
प्रत्येक मुलाचा स्वर्ग हा,
नको फक्त खडू अन् फळा
जोडीला नवा उपक्रम हवा!!
नवोपक्रमांची साथ घेता
शै. साधने मुलांना देता,
आनंद उमटतो चेहऱ्यावर अनोखा
शिक्षकास सांगावं नाही लागत माझंच
ऐका!!
वाचनाचे साहित्य देवून
वाढवायचे वाचन कौशल्य,
स्वनिर्मित साधनांचा वापर
हेच यशाचे साफल्य!!
मराठी भाषेसोबत धरु
इंग्रजीचाही ठेका,
इंग्रजी बाराखडीतून शिकवता येते
दोन्ही भाषेच्या समांतर रेखा!!
गणितासाठी परिसरातून साधने गोळा करु,
काड्या, मणी, पाने, खडे..
अंक मोजण्यासाठी फेर धरु!!
अभ्यासाची गोडी लागावी
म्हणून हाती घेऊयात नवोपक्रम
त्यासाठी असतात खरे हे उपक्रम!!

वासंती दुर्गाडे पुरंदर- पुणे.
९५५२५९३६७२

# प्रचलित शिक्षण पध्दतीत शिक्षकाची भूमिका आणि जबाबदारी



सुरेश उतपुरे
मलकापूर-बुलढाणा

शाळेचा दर्जा हा शिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असतो. शिक्षण विषय कुठलाही योजनेच्या केंद्रस्थानी शिक्षकच असतो. कोणतीही शक्षण योजना शिक्षकाशिवाय राबवली जाऊ शकत नाही. त्याचे सफल चिंतन हवे. त्यासाठी भरपूर वाचन, भरपूर श्रवण, करायला हवे. आपल्या दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर करावा.शिक्षकाबद्दल समाजामध्ये कायम आदराचे आणि मान-सन्मानाचे स्थान असते. यात शिक्षकाचा भय, चिंता, यांच्या गाठी शिक्षकाच्या सहज संवादाने दूर होऊ शकतात. विद्यार्थ्यांचा कल, त्याची आवड व त्याच्यातील क्षमता ओळखून त्याला आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षक योग्य मार्गदर्शन करू शकतात. स्वतःच्या आयुष्यात नैतिक मूल्याची आचरण करून समाजासमोर आदर्श मांडणारे शिक्षक एका अर्थाने समाजालाच घडविणारे शिल्पकार टिकवून ठेवण्यास शिक्षकाची भूमिका अत्यंत निर्णायक शिकवण शिक्षक रुजवू शकतो.

जगात कुठेही गुरू आणि शिक्षकांचा आदर केला जातो, काहींना अपार प्रेम दिले जाते, तर काही शिक्षक हे आयुष्यावरच केवळ प्रभाव टाकत नाही तर त्यांच्या जीवनातही स्थित्यंतर घडवून आणतात. शिक्षक विदयार्थ्यांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यास आणि त्यांना आकार देण्यास सज्ज असतात. जी भावी स्वप्ने (मुलांनी उराशी बाळगलेली असतात ती समजून घेत ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील असतात. शिक्षकाचे काम हे मार्गदर्शक, समुपदेशकाचे किंवा दिशादर्शकाचे असते. स्वत: शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. इतरांना शिकवणा-याने सतत शिकत राहायला हवे. त्याची शिकण्याची प्रक्रिया कधीही बंद पडू नये शिक्षकांनी आयुष्याच्या अंतापर्यंत विदयार्थी म्हणूनच जगायला हवे. त्यांनी शिकण्याची इच्छा कधीही मरू देता कामा नये. शाळेचा दर्जा हा शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. शिक्षण विषयक कुठल्याही योजनेच्या केंद्रस्थानी शिक्षकच असतो. कोणतीही शिक्षण योजना शिक्षकाशिवाय राबविली जाऊ शकत नाही म्हणून शिक्षणाशी संबंधित सर्व विषयावर त्याचे सखोल चिंतन हवे. त्यासाठी भरपूर वाचन, भरपूर श्रवण करायला हवे. आपल्या दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर करावा.महाराष्ट्र शासनाने बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क २००९ ला केला आणि त्याची अंमलबजावणी एप्रिल २०१० पासून सुरू झाली. त्यात शिक्षकांची कर्तव्ये सांगितली आहेत. शाळेत नियमितपणे वक्तशीरपणे हजर राहणे.कायदयातील तरतुदीनुसार अभ्यासक्रम संचालित करणे, व तो पूर्ण करणे.निर्धारीत कालावधीत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे.प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन करणे.कोणतीही आवश्यकता भासल्यास अतिरित पूरक शिक्षण देणे.माता-पिता आणि पालकाबरोबर नियमित सभा घेणे.अध्ययनातील प्रगती याबाबतची माहिती पालकांना अवगत करणे. विहित

करण्यातयेतील अशी सर्व कर्तव्ये पार पाडणे. आनंददायी, नावीन्यपूर्ण, पद्धतीचा अध्यापनात वापर व तणावमुक्त अध्ययन प्रक्रियेचा अवलंब करणे. शाळाबाह्य बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करणे व विशेष प्रशिक्षण पुरविणे.अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक, मूल्यमापन प्रक्रिया विकसन, प्रशिक्षण रचना व प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणे. बालकांचे संकलित नोंदपत्रक, अंतर्भूत असणारी माहिती अदययावत ठेवणे. शिक्षकांच्या कर्तव्यामुळे शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आलेली आहे शिक्षकांनी ती टाळून चालणार नाही. शिक्षकांनी राबविण्याचे उपक्रम: शिक्षकांनी खालील उपक्रम राबवावेत. शिक्षकाने ग्रंथालयात संस्कार करणा–या पुस्तकांच्या समावेश करावा.शाळेच्या प्रशासकीय वेळेव्यतिरित इतर वेळात संस्कार वर्गाचे आयोजन करावे.पालकांशी विदयार्थ्यांच्या प्रगतीबाबत चर्चा करणे.शाळेतील बालसभांमधून (जयंती, पुण्यतिथी, इतर विशेष दिन मार्गदर्शनाचे जाणीवपूर्वक नियोजन करणे.अध्यापन ही एक साधना मानणे.तणावमुक्त अध्यापन करून सुसंस्कारित भावी पिढी निर्माण करणे.व्यापक सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन करून मुलांचे प्रगतीपत्रक तयार करणे. विविध प्रशिक्षणात सहभागी होणे.शाळा व्यवस्थापन समितीत शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून

काम करणे.

शासनाने निर्धारीत केलेली किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त करणे.सकाळ–दुपार विदयार्थ्यांची हजेरी घेणे. गैरहजर मुलांच्या पालकांच्या भेटी घेऊन चौकशी करणे.कृतिशील अध्ययन, ज्ञान रचनावाद, बालस्नेही, स्वयं अध्ययन इत्यादी द्वारा ज्ञानदानाचे कार्य करणे. कार्यक्रमाचे सादरीकरण, सूत्र संचालन कसे करावे या विषयी मार्गदर्शन करणे. शैक्षणिक सहलीचे आयोजन करून ऐतिहासिक वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे मूल्य रुजविणे.मुलांचे नियमित स्वाध्याय तपासणे व झालेल्या चुका त्यांचे निदर्शनास आणून देणे. विविध स्पर्धांचे आयोजन करणे. उदा. हस्ताक्षर इत्यादी.विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसे देणे. शिक्षकाने मनापासून अध्यापन करावे.

शिक्षकांनी प्रामुख्याने विद्यार्थ्यांविषयी पुढील गोष्टी लक्षात घेणे आवश्यक !

विद्यार्थी पाठ्यपुस्तकांतच घोटाळणार नाहीत, इकडे लक्ष द्या.त्यांना ग्रंथालयात जाणे आणि अधिकाधिक ज्ञानकण ग्रहण करणे, यांसाठी प्रेरित करा.त्यांना अधिक आणि नेमके ज्ञान मिळेल, इकडे लक्ष द्या.विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचल्यावर त्यांना त्यावर विचार करायला शिकवा.आपले शिक्षक आणि अन्य विद्यार्थी यांच्यासह चर्चा करायला त्यांना प्रेरित करा.शिक्षक हा केवळ शिकवत नसतो, तर विद्यार्थ्यांत स्वतंत्रपणे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता निर्माण करत असतो. क्लासरूम मॅनेजमेंट हे एक लिंचपिन आहे जे अध्यापन शिकण्याच्या प्रक्रियेत शिकवणे आणि शिकणे साध्य करता येते. नियोजन, कार्यपद्धती आणि संसाधने आयोजित करणे, कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी वातावरणाची व्यवस्था करणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे,संभाव्य समस्यांचा अंदाज घेणे यामध्ये मुख्य भूमिका शिक्षकच बजावतात. आज प्रचलित शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षणाप्रती शिक्षकाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाचा आहे.

**श्री सुरेश उतपुरे हे जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा ता.मलकापूर जि.बुलढाणा शिक्षण म्हणून कार्यरत आहेत.**

**–९६५७५७९७८५**

# कांगारू-रॅट



डॉ.नंदा हरम
पुणे

शीर्षक वाचून आश्चर्य वाटलं ना ? कांगारु आणि रॅट,अशा पूर्णपणे भिन्न प्राण्यांचं मिश्रण असलेला हा कोणता प्राणी ! तसं नसून या दोघांचे गुणधर्म या प्राण्यात आहेत.म्हणून त्याचं नाव कांगारु रॅट!

हा सस्तन वर्गातील प्राणी असून कृतंक म्हणजे कुरतडाणारा सजीव आहे.दिसतो उंदरासारखा हा सजीव मुख्यत्वे वाळवंटी भागात आढळतो. उत्तर अमेरिकेच्या नैऋत्य भागात विशेषत्वाने दिसून येतो.

बाह्यरुप :– कांगारु रॅटचे पुढचे पाय छोटे,मात्र मागचे पाय मोठे असतात.पायाला चार बोटं असतात.त्यांचं डोकं त्या मानाने मोठं असतं.पुर्ण वाढलेल्या कांगारु रॅटचं वजन ७० ते १७० ग्रॅम एवढं असतं.डोळे मोठे आणि कान छोटे असतात. त्यांची शेपूट मात्र त्यांच्या शरीरापेक्षा आणि डोक्यापेक्षाही लांब असते. या केसाळ शेपटीला पांढरा किंवा तपकिरी तुरा असतो जो हालचाल करतांना शरीराचा तोल सांभाळतो.

आकृतीतील (क्र.१ पहा) कांगारु रॅटची छबी पाहिल्यावर




तुमच्या लक्षात येईल की कांगारु नाव कुठून आलं? येतंय त्यांच्या लांब शेपटीला शरीराचा तोल सांभाळायला उपयोग होतो एवढंच नाही तर कांगारु प्रमाणेच मागच्या पायांचा उपयोग करुन ते उड्या मारतात.एका उडीत ते किती अंतर कापतात.कल्पना करु शकता? चक्क२ मीटर! म्हणजे जवळ जवळ ७ फुट

अन्न :– कांगारु रॅटस मुख्यत्वे बिया खाण्याकरिता प्रसिध्द आहेत. ते इतर ही काही पालापाचोळा खातात.तसेच वर्षांतील काही काळ ते किटकांचं ही भक्षण करतात. विशेष म्हणजे,(क्र.२ पहा) दाखविल्याप्रमाणे त्यांच्या गालात पाऊच




आकृती क्र. २

(पिशवी) असतात.ज्यात ते बिया साठवतात.ते बियांचा जमेल तेवढा साठा करुन ठेवतात. वाळवंटी प्रदेशात उष्णतेपासून बचाव व्हावा,म्हणून ते बिळात रहातात. दिवसा ते बाहेर पडत नाहीत.रात्रीचे बाहेर पडतात. ते निशाचर

असतात.त्यांना घाम येत नाही.त्यामुळे पाण्याची बचत होते. ते सहसा पाणी ही पीत नाहीत. बियांमध्ये असलेले बाष्प त्यांना पुरेसे असते.ते एकदा बाहेर पडले की मिळतील त्या बिया पाऊचमध्ये भरुन आपल्या बिळात आणून साठवतात.

बिळाची वैशिष्टये :- कांगारु रॅट ज्या बिळांत रहातात. ते साधं नसतं,गुंतागुंतीच असतं.त्यांच्या जातीप्रमाणे त्यांच्या रचनेत व दिशांमध्ये फरक आढळतो.(आकृती क्र.३ पहा) बिळामध्ये वेगवेगळे कक्ष असतात.त्यांच्या उपयोग




**आकृती क्र.३ : बिळांची रचना आणि दिशानिश्चिती**

वेगवेगळ्या कारणांसाठी जसे की झोपणे,अन्न साठवणे इ.करिता केला जातो. बिळांमधील अंतर हे कांगारु रॅटच्या संख्येवर तसेच अन्नसाठ्यावर अलवंबून असते.(आकृती क्र.४ पहा)कांगारु रॅट समूहाचे रहाणे पसंत करतात. बिळात राहण्यामुळे त्यांचा वाळवंटातील उष्णतेपासून बचाव होतो. बिळातील तापमान तसेच आर्द्रता स्थिर ठेवण्यासाठी ते दिवसा बिळाचे प्रवेशव्दार मातीने बंद करतात. जेव्हा बाहेरचे तापमान खूपच वाढते,तेव्हा दिवसा ते त्यामानाने



**आकृती क्र.४ : कांगारू रॅटसची बिळे**

थंड व दमट अशा बिळामध्ये राहणेच पसंत करतात.रात्रीच्या वेळी ते बाहेर पडतात. श्वासोच्छवासातून बाष्प फुकट जाऊ नये,म्हणून कांगारु रॅट आपलं नाक अंगावरील फरमध्ये खूपसून झोपतात. त्यामुळे दमट हवा तिथे गोळा होते.

सहजीवन :- कांगारु रॅटस् तसे एकेकटे रहाणेच पसंत करतात.प्रजननाच्याकाळात ते एकमेकांशी संपर्क साधतात. तर हा मादीपेक्षा जास्त आक्रमक असतो.त्यांच्या पुनरुत्पादनाचा आवेग अन्नसाठ्याची उपलब्धता आणि वातावरणावर अवलंबून असते.साधारण फेब्रुवारी ते मे हा त्यांचा प्रजननाचा काळ असतो.वर्षाला २ ते ३ पिल्लांना ते जन्म देतात. गर्भधारणा कालावधी २२ ते २७ दिवसांचा असतो.

बिळातच मऊ अस्तर असलेल्या घरट्यात पिल्लांना जन्म दिला जातो. जन्मत पिल्लं दृष्टीहीन आणि केसविरहीत असतात पहिल्या आठवड्यात ही पिल्लं रंगतात. दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात त्यांचे मागचे पाय विकसित व्हायला सुरुवात होते. या वेळेपर्यंत पिल्लू स्वतंत्र्य होते.

कांगारु रॅटचं आयुष्य प्रदीर्घ नसते. फक्त २-५ वर्षांचे आयुष्य ते जगते.

कांगारु रॅटस्चे समायोजन - कांगारु रॅटसची वातावरणाशी जूळवून घेण्याची क्षमता अफाट असते.सहसा त्यांच्या अंगावरच्या फरचा रंग वाळू मिळता जुळता असतो. त्यामुळे तो चटकन लक्षात येते नाही. वाळवंटामध्ये दिवसा तापमान जास्त असतं या उष्णतेपासून वाचण्याकरिता कांगारु रॅटस खोल बिळात दिवसा राहतात. बाहेरच पडत नाहीत.

या प्रदेशामध्ये प्राणी मिळणं,महामुश्किल! यावर कांगारु रॅटने यशस्वी मात केली आहे. त्यांच्या शरीराने असे

समाघोजन केले आहे की शरीराला लागणारे पाण्याची अत्यंत कमी व शरीरातून होणारा पाण्याचा अपव्यय अत्यल्प ठेवण्याचे कसव त्याने साधले आहे. जरी कांगारु रॅटचे मुख्य अन्न सुक्या बिया असल्या तरी त्याला पाण्याची गरज भासत नाही. या बिया जेव्हा तो बिळात साठवून ठेवतो.तेव्हा त्या बिया ३० टक्यांहून जास्त बाष्प .शोषून घेतात त्यामुळे कांगारु रॅट जेव्हा १ ग्रॅम बिया खातो,तेव्हां जवळ –जवळ त्यातून अर्धा ग्रॅम पाणी त्याला मिळते. एवढेच नाही.तर कांगारु रॅटची मूत्रपिंड (किडनी) मूत्रातील पाणी काढून घेते,इतके की मूत्र जवळ जवळ स्फटीकासमान होते. अशातऱ्हेने पाण्याचा अपव्यय वाचतो.कांगारु रॅटना आंघोळीकरिता पाणी लागत नाही. वाळूतच चोळून ते अंग साफ करते.

कांगारु रॅटला भक्षक खूप आहेत. पण त्यांच्यापासून बचाव करण्याकरिता त्याला त्याचे मजबूत मागचे पाय उपयोगी पडतात. त्यांच्या सहाय्याने एकावेळी तो अगदी ९ फुटापर्यंत लांब उडी मारतो आणि शत्रूला गुंगारा देतो. सापाने पकडण्याच्या प्रयत्न केला तेव्हा या मागण्याच पायांनी लाभ मारुन स्वत:चं रक्षण केल्याचे वृत्त आहे कांगारु रॅटचे कान आकाराने लहान असले तरी ते अत्यंत तीक्ष्ण आहेत. हळूवारपणे येणाऱ्या घुबड किंवा सापाची चाहूल त्यांना आधीच लगते, त्यामुळे तो स्वत:चं रक्षण करु शकतो. अगदी घुबडाचा पंस फडकलेला ही त्याला समजतो.

पर्यावरणातील भूमिका :– पर्यावरणात कांगारु रॅटची नेमकी भूमिका काय ! हे जरी नीटसे माहिती नसले तरी एक खरे!तो अनेक प्राण्यांचे आवडते भक्ष्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तो बियांचा साठा करुन ठेवतो. त्यामुळे बिज प्रसारात महत्वाची भूमिका बजावतो.

(डॉ.नंदा संतोष हरम,विज्ञान प्रसारक म्हणून कार्यरत आहेत.)
९३७२९१०३०६

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.


५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

**संपर्क** :शिक्षणयात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे 8208301001shikshanyatri11@gmail.com



श्वापद फिरताय
गावागावात ....
गल्लीबोळात ......
आधुनिकीकरण अस की
वासनाही फिरते आता नेटवर
आणि झुंडीने जानवर
तुटुन पडतात स्त्रीशरीरावर

तीच सबलीकरण करायला
निघलेत जी भेदरलेल्या
मनाने जगतेय
निर्भया निर्भया करून ओरडताय
तिच्या नावाने
जिच्या लज्जेची लक्तरे
ठिकठिकाणी दिसताय

बलात्कार शब्दातील घृणाही
आता सरत चाललीय
कारण माणसातली
संवेदनाच मरत चाललीय
......
सूडाची भावनाही तशीच
बळावतेय हळू हळू
विनाशाची नांदी बघ
येतेय ना ऐकू ....
कारण श्वापद रूजतायत
तनातनात .....
मनामनात ......

नी .अ .श्रीराम

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ५००

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्णी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

Pragati Arts Shirpur 8421356261

प्रती, ................................................

..................................................

..................................................